*Progressive Education Society's*
**Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous)**
**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra.**

**VOLUME 11, ISSUE 5** **MAY 2026**

# *MODLIB: E-Bulletin of Library & Information Centre*

## *1st May, Maharashtra Day Celebrations*








**E-bulletin published by:**
**Prof. Dr. Nivedita G. Ekbote, Principal, MCASC (Autonomous), Shivajinagar, Pune-5.**
**Editor: Dr. Shantashree Sengupta, Librarian.**
**Editorial Assistant: Mrs. Sarika Sable, Clerk, Library.**
**E-mail: librarian@moderncollegepune.edu.in**

***'MODLIB'*** : E-Bulletin of Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5.

Frequency: Monthly

Mode of Publication: Online

Issue: May 2026

***Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.***

# *Table of Contents*


| Sr. No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 1 | Articles by Hon'ble Prof. Dr. Gajanan R. Ekbote, Chairman, P.E.Society, Pune-5 | |
| | • *Uchcha Shikshanavaril Vishwasat Ghat (उच्च शिक्षणावरील विश्वासात घट)* | 4 |
| | • *'NEET' la paryaya ('नीट'ला पर्याय)* | 5 |
| 2 | Maharashtra Day Celebrations | 6 - 8 |
| 3 | Events conducted by the Library & Information Centre during May 2026 | |
| | • *Chhatrapati Sambhaji Maharaj Jayanti* | 9 - 11 |
| | • *National Anti-terrorism Day* | 12 - 13 |
| | • *Swatantrayaveer Savarkar Jayanti* | 14 - 15 |
| | • *Ahilyabai Holkar Jayanti* | 16 - 17 |
| 4 | Books received in Gratis in Library during May 2026 | 18 |
| 5 | E-newspaper Clippings | 20 - 37 |
| 6 | Upcoming Events: June 2026 | 38 |
| | | |

# Article by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune-5.

प्रभात

## उच्च शिक्षणावरील विश्वासात घट

**अमेरिकेतील महाविद्यालये आणि विद्यापीठे हेच उच्च शिक्षणावरील अमेरिकन जनतेचा विश्वास कमी होण्यास मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहेत, असे येल विद्यापीठाच्या समितीने नुकताच प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटले आहे.**

**शैक्षणिक**


-प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे

येल विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीने तयार केलेल्या अहवालामध्ये, अमेरिकेतील महाविद्यालयांच्या आणि विद्यापीठांच्या घसरत्या दर्जाबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

येल अहवालात, शैक्षणिक क्षेत्रात राजकीय व सांस्कृतिक शक्तींच्या वाढत्या भूमिकेचे कठोर चित्रण केले आहे. अमेरिकेतील उच्च शिक्षणाचे स्थान सध्या झपाट्याने बदलत आहे. उच्च शिक्षणाचा वाढता खर्च, अस्पष्ट व गुंतागुंतीची प्रवेश प्रक्रिया, असमान शैक्षणिक निकष आणि कॅम्पसमधील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अभाव या सर्व कारणांमुळे उच्च शिक्षणाच्या उपयुक्ततेबद्दल अमेरिकेत असंतोष वाढत आहे, असे समितीने नमूद केले आहे. या निष्कर्षांमुळे अनेक वर्षांच्या सर्वेक्षण व मुलाखतींमध्ये अमेरिकन लोकांनी व्यक्त केलेल्या शंकांचे/भीतीचे प्रतिबिंब दिसते. अत्यंत प्रतिष्ठित येल विद्यापीठातील दहा प्राध्यापकांच्या समूहाने तयार केलेला हा अहवाल अमेरिकेतील शैक्षणिक क्षेत्रावर कठोर टीका करतो.

अहवालात म्हटले आहे की, विश्वास म्हणजे आपण जे सांगतो ते कृतीत आणून आणि ते चांगल्या प्रकारे करून दाखविणे. उच्च शिक्षणाच्या मूलभूत उद्दिष्टांबद्दल अमेरिकन विद्यापीठांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनिश्चितता आणि अस्पष्टता असल्यामुळे उच्च शिक्षण संस्थांवरील अमेरिकन जनतेचा विश्वास कमी होत आहे.

सामाजिक समस्या सोडवण्यासाठी मदत करण्याबाबत विद्यापीठांवर दबाव येत आहे, असे नमूद करताना समितीने म्हटले आहे. निवडक परंतु सर्वसमावेशक, परवडणारी परंतु चैनीची/आलिशान, आणि गुणवत्ताप्रधान परंतु न्याय्य अशी 'प्रत्येकासाठी' असण्याची मोठी आणि विचित्र अपेक्षा विद्यापीठांकडून केली जात होती. मात्र, उद्दिष्टे आणि ध्येये स्पष्ट नसल्यास, महाविद्यालये व विद्यापीठे आपल्या मूलभूत बांधिलकीला कितपत न्याय देत आहेत? हे ठरवणे कठीण होते, असे मत प्राध्यापकांनी व्यक्त केले.




बहुतेक अमेरिकन शिक्षण संस्था येलसारख्या संस्थांपेक्षा खूप वेगळ्या आहेत, जिथे आर्थिक मदतीशिवाय पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा अंदाजित वार्षिक खर्च ९० हजार डॉलर्सपेक्षा जास्त असतो. अनेक संस्थांमधील प्रशासक, ज्यापैकी बहुतांश संस्थांचा खर्च खूपच कमी आहे आणि अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश देतात, त्यांच्या संस्था निवडक विद्यापीठांशी अन्यायकारकपणे जोडलेल्या आहेत.

या सर्वसाधारण समजुतींमुळे सध्या विद्यापीठांमधील अभ्यासक्रम, विद्यापीठांना करदात्यांचा पाठिंबा आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी उच्च शिक्षण व्यवस्थेवर केलेल्या टीकेसंबंधी अमेरिकेत जोरदार चर्चा सुरू आहे.

अमेरिकेत विद्यापीठे आणि महाविद्यालयांबाबतचे मतभेद आणि विवाद नवीन नाहीत. मात्र, समितीने सांगितले आहे की सध्याच्या काही पद्धतींच्या एकत्रित परिणामामुळे शैक्षणिक क्षेत्राची प्रतिमा वेगाने घसरली आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये फक्त ३५% अमेरिकन लोकांनी महाविद्यालयीन शिक्षण अत्यंत महत्त्वाचे मानले. हे प्रमाण २०१३ च्या तुलनेत निम्मे आहे. २०१३ मध्ये हे प्रमाण सुमारे ७०% होते.

ट्रम्प प्रशासनाने उच्चभ्रू विद्यापीठांवर टीका केल्यानंतर आणि विद्यापीठांना देण्यात येणाऱ्या निधींमध्ये कपात सुरू केल्यानंतर, येलने हा अहवाल तयार करण्याचे काम हाती घेतले. येलचे अध्यक्ष मॉरी मॅकेनिस यांनी सांगितले की, शैक्षणिक खात्याच्या नेत्यांनी लोकांच्या भावना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याची गरज आहे.

या अहवालात उच्च शिक्षणाच्या उद्दिष्टांचे कौतुक केले असले, तरी येलसह अनेक संस्थांनी त्यांच्याविषयी असलेला जनतेचा दृष्टिकोन नकारात्मक कसा होत गेला? याबाबत स्पष्टपणे मांडले आहे.

उदाहरणार्थ, येल आणि इतर अनेक संस्था प्रचंड फी आकारतात, पण नंतर मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देतात. त्यामुळे अनेक विद्यार्थी प्रत्यक्षात कमी पैसे भरतात. तरीही या चुकीच्या धोरणामुळे त्यांच्यावरील जनतेचा विश्वास कमी झाला आहे. ही प्रणाली गुंतागुंतीची, अनिश्चित, गुप्त आणि नेहमी बदलणारी आहे. त्यामुळे जनतेचा विद्यापीठांवर विश्वास वाढण्याऐवजी कमी होतो, असे अहवालात स्पष्टपणे म्हटले आहे.

ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न २ लाख डॉलर्सपेक्षा कमी आहे, त्यांना पदवीपूर्व शिक्षण शुल्क आकारले जाणार नाही. त्याचप्रमाणे ज्या विद्यार्थ्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न १ लाख डॉलर्सपेक्षा कमी आहे, त्यांना कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, असे येलने जानेवारीमध्ये जाहीर केले होते. पदवीपूर्व प्रवेश प्रक्रिया चांगल्या हेतूने सुरू केल्या असल्या तरी, अनेकदा अपारदर्शक आणि गुंतागुंतीच्या असतात, हे लक्षात घ्या. कारण श्रीमंत विद्यार्थीच प्रवेश घेऊ शकतील अशीच अनुकूल परिस्थिती असते. शैक्षणिक कामगिरीसारख्या मूलभूत बाबींसाठीही त्यात सुस्पष्ट मानकांचा पूर्णपणे अभाव असतो. येल ही अशा संस्थांपैकी एक आहे जिथे किमान चाचणी गुणांची देखील अट नाही.

जेव्हा प्रवेश प्रक्रिया अनाकलनीयपणे अधिक वाईट आणि आधीच सधन असलेल्यांना फायदा होईल अशा प्रकारे पक्षपाती वाटतात, तेव्हा अनेक अमेरिकन नागरिक या प्रक्रियेवर विश्वास ठेवत नाहीत. एकंदरीत अमेरिकेमध्ये उच्च शिक्षणाची परिस्थिती पारदर्शक नाही. अमेरिकेत महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये श्रीमंतांना अनुकूल अशी परिस्थिती आहे. त्यामुळे सर्वसामान्य पालकांचा विद्यापीठे आणि उच्च शिक्षणावरील विश्वास कमी होत चालला आहे.

Pune City Edition
May 16, 2026 Page No. 4
Powered by: erelego.com

# Article by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune-5.

प्रभात

## 'नीट'ला पर्याय!

**शैक्षणिक**

- प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे

**नीट पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर एनटीएच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. एनटीएचे परीक्षक दरवर्षी बदलावेत. नीट परीक्षेची मोनोपॉली कमी करण्याचा प्रयत्न आगामी काळात करावा लागेल.**




देशाची शिक्षण व्यवस्था ही समाजाच्या भविष्यासाठीचा भक्कम पाया मानली जाते. याच व्यवस्थेतून डॉक्टर, अभियंते, प्रशासक, संशोधक, वकील, शिक्षक आणि शास्त्रज्ञ इत्यादी घडतात. शिक्षणामुळे देशाचा विकास घडतो.

जेव्हा भ्रष्टाचार, परीक्षा प्रश्नपत्रिका फुटणे आणि भविष्यातील करिअरची विक्री हा शिक्षणाचा पाया पोखरू लागते, तेव्हा काय होते? नीट २०२६ प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणाने केवळ हा प्रश्न निर्माण केलेला नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर गडद सावली टाकली आहे. त्यामुळे देशातील शिक्षण व्यवस्था कशी रसातळाला गेली आहे, हे स्पष्ट झाले.

या घोटाळ्याची सर्वात धक्कादायक बाब म्हणजे हा घोटाळा सरकारच्या दक्षतेमुळे, मंत्र्यांच्या चौकशीमुळे किंवा राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए)च्या सतर्कतेमुळे उघड झाला नाही. उलट, एका प्रामाणिक नागरिकाच्या जागरूकतेमुळे, एका कर्तव्यदक्ष शिक्षकाच्या पडताळणीमुळे आणि चौकशी दरम्यान झालेल्या एका फोन कॉलमुळे हे प्रकरण समोर आले. यामुळे एक गंभीर प्रश्न निर्माण होतो. भारत सरकारचे शिक्षण मंत्रालय नेमके काय करीत होते? एनटीए काय करीत होते? हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न झाला होता काय?

केंद्र सरकार सतत डिजिटल इंडिया, पारदर्शक परीक्षा आणि तंत्रज्ञानाधारित मूल्यमापन यांची घोषणा करत असते. तरीही प्रश्नपत्रिका आठवड्या आधीच फिरत होत्या, राज्यांच्या सीमा ओलांडत होत्या, सोशल मीडियावर प्रसारित केल्या होत्या, पैशांच्या बदल्यात विकल्या जात होत्या आणि कोचिंग नेटवर्कद्वारे समाजमाध्यमांवर जात होत्या. तरीही अधिकृत यंत्रणा पूर्णपणे अनभिज्ञ राहिली. हे शिक्षण मंत्रालयाच्या व एनटीएच्या निष्काळजी कारभाराचे विदारक उदाहरण आहे.

आरोपांनुसार एनटीएचे काही भ्रष्टाचारी अधिकारी, काही एमबीबीएसचे विद्यार्थी, लोभी भ्रष्ट शिक्षक, धनदांडगे कोचिंग क्लास चालक, दलाल, धनदांडगे पालक आणि प्रश्नपत्रिका पुरवठादार या रॅकेटमध्ये सहभागी होते. उद्याचे डॉक्टर बनणारे काही विद्यार्थी जर पैशासाठी परीक्षेची पवित्रता विकायला तयार होत असतील, तर देशाच्या आरोग्य व्यवस्थेचे भविष्य किती सुरक्षित राहील? अशा डॉक्टरांच्या हातात देशाचे आरोग्य सुरक्षित आहे का? असा प्रश्न निर्माण होतो.

डॉक्टर होणे म्हणजे फक्त एमबीबीएसची पदवी मिळवणे नाही; ती एक नैतिक जबाबदारी आहे. त्यांना गुणवत्ता, कौशल्य हवे. पण जर वैद्यकीय शिक्षणाचे प्रवेशद्वारच पैशांच्या बाजारात बदलले, तर समाजाला चांगले, कुशल डॉक्टर कसे मिळतील? प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या, रात्रंदिवस मेहनत घेणाऱ्या आणि आपल्या कुटुंबाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी झटणाऱ्या लाखो गरीब, हुशार विद्यार्थ्यांवर हा मोठा अन्याय आहे.

प्रत्येक वेळी प्रश्नपत्रिका फुटल्यावर सरकारची नेहमीची तीच प्रतिक्रिया असते. चौकशी समित्या नेमल्या जातात, सीबीआय चौकशी जाहीर होते आणि कठोर कारवाईची भाषा केली जाते. पण प्रत्येक घोटाळ्यानंतर हे चक्र पुन्हा का सुरू होते? प्रश्नपत्रिका फुटतात, परीक्षा रद्द होतात, विद्यार्थी मानसिक तणावात जातात आणि आरोपींची संख्या वाढत जाते; पण व्यवस्था मात्र बदलत नाही. त्याचप्रमाणे आतापर्यंत कोणालाही शिक्षा देखील झालेली नाही.

आता शिक्षण मंत्रालयाला फक्त निवेदने देण्यापलीकडे जावे लागेल. एनटीएची जबाबदारी स्पष्टपणे निश्चित केली पाहिजे. परीक्षा सुरक्षेची संपूर्ण यंत्रणा नव्याने उभी केली पाहिजे. प्रश्नपत्रिका परत फुटल्यास संस्थात्मक स्तरावर थेट जबाबदारी निश्चित झाली पाहिजे.

देशाला डॉक्टरांची गरज आहे, पण गुणवत्ता, नैतिकता आणि प्रामाणिकपणाच्या आधारे निवडलेले डॉक्टर हवे आहेत. पैशाच्या जोरावर परीक्षा पास झालेले नव्हेत. फुटलेल्या प्रश्नपत्रिकेमुळे मिळालेली पदवी एखाद्याला नावापुरते डॉक्टर बनवू शकते, पण विश्वासार्ह डॉक्टर, आरोग्य व्यवस्था निर्माण करू शकत नाही.

आज हा प्रश्न देशाच्या शिक्षण व्यवस्थेचा आहे. जर सरकारने याकडे केवळ आणखी एक घोटाळा म्हणून पाहिले, तर समाजाचा शिक्षणावरील विश्वास वेगाने कोसळायला फार वेळ लागणार नाही. विरोधकांनीसुद्धा नुसती आंदोलने करण्यापेक्षा उपाययोजना सुचविल्यास ते स्वागतार्ह होईल. शिक्षणतज्ज्ञांनी देखील हे करावे, अशी अपेक्षा आहे.

या संपूर्ण घोटाळ्यामध्ये धनाढ्य कोचिंग क्लासचालक, एनटीएमधील काही भ्रष्ट अधिकारी, काही लोभी, भ्रष्ट प्राध्यापक, समाजातील गुन्हेगार, त्याचप्रमाणे काही धनाढ्य डॉक्टर ज्यांना त्यांच्या मुला-मुलींना डॉक्टर करावयाचे आहे ते डॉक्टर्स कारणीभूत आहेत.

या निमित्ताने नीटला पर्याय म्हणून खालील पर्यायाचा गांभीर्याने विचार करावा. १) ११वी परीक्षा बोर्डाने घ्यावी, २०% गुण २) १२वी बोर्ड परीक्षा ३०% गुण ३) नीट परीक्षा ५०% गुण. या तिन्ही गुणांच्या आधारे वैद्यकीय प्रवेश देण्यात यावेत.

त्यामळे केवळ नीट परीक्षेवर अवलंबून न राहता ११ वी आणि १२ वीच्या परीक्षेच्या गुणांना देखील महत्त्व राहील. नीटचे अवास्तव महत्त्व देखील कमी होईल.

Pune City Edition
May 30, 2026 Page No. 4
Powered by: erelego.com

# *Maharashtra Day Celebration: 1st May 2026*

## सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

## Maharashtra Day Celebration | 1st May 2026

Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 proudly celebrated Maharashtra Day with great enthusiasm and patriotic spirit.

The program commenced with the Flag Hoisting Ceremony, followed by the soulful rendition of Maharashtra Rajyageet, Vande Mataram, and the National Anthem, filling the atmosphere with pride and unity.

Our respected Principal, Prof. Dr. Nivedita Ekbote Madam, addressed the gathering with an inspiring speech highlighting the glorious history, rich culture, and vibrant heritage of Maharashtra, motivating everyone to uphold the values and legacy of our great state.

The event was graciously attended by all teaching and non-teaching staff members, making it a memorable and meaningful celebration.

Let us continue to contribute towards the progress and pride of Maharashtra!

जय महाराष्ट्र!






# *Maharashtra Day Celebration: 1st May 2026*




















# *Maharashtra Day Celebration: 1st May 2026*














# Events Conducted by Library during May 2026

## *1. Chhatrapati Sambhaji Maharaj Jayanti: 14th May 2026*

On 14.05.2026, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated Chhatrapati Sambhaji Maharaj Jayanti as per the Government of Maharashtra GR under the guidance of Principal Prof. Dr. Nivedita Ekbote Madam.

Vice Principal Prof. Shamkant Deshmukh Sir, Secretary, Progressive Education Society Pune, Librarian Dr. Shantashree Sengupta, Registrar Shri. Ganesh Sathe and Library Staff members paid their respect to Chhatrapati Sambhaji Maharaj.

Prof. Shamkant Deshmukh Sir mentioned that Chhatrapati Sambhaji Maharaj was the eldest son of Chhatrapati Shivaji Maharaj and the second Chhatrapati of the Maratha Empire. Sir also briefed about the early life, military expeditions and conflicts, governance, innovations and literary contributions of Chhatrapati Sambhaji Maharaj. Sambhaji Maharaj composed several books during his lifetime. The most notable is 'Budhbhushanam' written in Marathi and Sanskrit.

I am thankful to all the Staff Members who were present during the program.

**Regards,**
**Dr. Shantashree Sengupta,**
**Librarian.**






# Events Conducted by Library during May 2026

**छत्रपती संभाजी महाराज**
**(दि.१४ मे, १६५७ -११ मार्च, १६८९)**
**(अल्प परिचय)**

छत्रपती शिवाजी महाराजांनंतर मराठ्यांच्या गादीवर आलेले हे दुसरे छत्रपती. त्यांचा जन्म छत्रपती शिवाजी महाराज व सईबाई यांच्या पोटी पुरंदर किल्ल्यावर (पुणे जिल्हा) झाला.

छत्रपती संभाजी महाराजांच्या *"बुधभूषण"* या ग्रंथात काव्यालंकार, शास्त्रे, संगीत, पुराणे, धनुर्विद्या यांचा अभ्यास केल्याचा उल्लेख आहे. या शिवाय गागाभट्टांकडून "नीतिपर *समयनय*"हा ग्रंथ (पोथी) त्यांनी लिहून घेतला.

संभाजी महाराजांचा विवाह पिलाजीराजे शिर्के यांची कन्या राजसबाई बरोबर झाला (१६६५). तिचे नाव येसूबाई ठेवण्यात आले. येसूबाईंपासून त्यांना कन्या भवानीबाई (१६७८) आणि पुत्र शिवाजी (१६८२-छत्रपती शाहू) ही दोन अपत्ये झाली.

वयाच्या नवव्या वर्षीच ते मोगली मनसबदार बनले. सन १६७२ पासून त्यांनी प्रत्यक्ष लढाईत भाग घेतल्याचा उल्लेख आढळतो. त्यांनी कलीची उपासना केली आणि नंतर कलशाभिषेक करून घेतला (दि.२३ मार्च १६७८). दि.१८ जून १६८० रोजी ते रायगडास पोहोचले आणि जुलैमध्ये त्यांनी स्वतः मंचकारोहण करून पुढे दि.१६ जानेवारी १६८१ रोजी रायगड येथे विधिवत "राज्याभिषेक" करून घेतला.

संभाजी महाराजांनी सिद्दीच्या उंदेरीवर हल्ले चढविले (जुलै १६८१). पुढे सन १६८१ ची जंजिऱ्याची मोहीम हाती घेतली. जंजिऱ्याची खाडी दगड, लाकूड, कापसाच्या गाठी यांनी भरून काढण्याचा प्रयत्न केला. परंतु खवळलेल्या समुद्रामुळे तो निष्फळ ठरला, तरी सुद्धा हा अयशस्वी वेढा पुढे आठ महिने चालला. समुद्रातील या लढाईमुळे संभाजी महाराजांनी आपले नौदल आणि आरमार मोठया प्रमाणात वाढविले. त्यातूनच पुढे प्रसिद्ध आंग्रे घराण्याचा उदय झाला. संभाजी महाराजांनी सन १६८२ मध्ये अंजदीव बेटावर स्वारी केली. संभाजी महाराजांनी खंदेरी इंग्रजांस देण्याचा विचार मान्य केला नाही. संभाजी महाराजांनी उत्तर कोकणातील दोन किल्ले जिंकून घेतले (१६८३), तसेच जुनी साष्टी व बारदेस येथेही चढाई केली.

**छत्रपती संभाजी-मुघल संघर्ष** :

संभाजी महाराज, आदिलशाह आणि कुतुबशाहा यांचा गट तयार होऊन या त्रिकूटाने मुघलांशी सामना देण्याची तयारी केली. त्यांची उभी कारकीर्द औरंगजेबाविरूद्ध लढा देण्यात गेली. प्रारंभी त्यांच्या फौजांनी बुऱ्हाणपूर काबिज केले. औरंगाबादच्या सभोवतालचा मुलूख जिंकला (१६८१). मुघलांच्या या आक्रमणाचा त्यांनी चांगलाच प्रतिकार केला. त्यांनी गोवळकोंडेकर आणि विजापूरकर यांना मुघलांविरूद्ध वेळोवेळी मदत केली.

सन १६८७ ते ८९ पर्यंतच्या काळात मुघलांनी सर्व बाजूंनी संभाजी महाराजांस वेढले असले तरी सातारा विभागातील सातारा, परळी, निंब, चंदन-वंदन, कऱ्हाड, माजगाव, मसूर हे, तर दक्षिण कोकणातील संगमेश्वर, राजापूर, पन्हाळा, मलकापूर, खेळणा, शिरोळे, फोंडे, कोपल हे आणि कुलाबा, खंदेरी, राजकोट, सागरगड, पद्मदुर्ग, चौल हे उत्तर कोकणातील प्रदेश मराठ्यांकडेच होते.


छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच संभाजी महाराजांनी अष्टप्रधानांव्दारे राज्यव्यवस्था चालू ठेवल्याचे दिसते. वतनाचे निवाडे, किल्ल्यांची निगराणी, जमिनींचे महसूल पध्दत, आयात-निर्यात कर, चौथाईची वसुली इ. कामकाज व्यवस्थितपणे झालेले दिसते. सन १६८६-८७ मध्ये महाराष्ट्रात दुष्काळ पडला, तेव्हा त्यांनी पुनर्वसनासाठी कौलनामे दिले. व्यापाऱ्यांना सवलती देऊन महसुलात वाढ करण्याचा प्रयत्न केला. सैनिकी व्यवस्थेत घोडदळ, पायदळ, तोफखाना तसेच समुद्रावरील शत्रूशी लढण्यासाठी कार्यक्षम नौदल निर्माण केले. एकाच वेळी मुघल, पोर्तुगीज, इंग्रज, सिद्दी यांच्याबरोबर त्यांना एकाकी लढा द्यावा लागला.

**उदार धार्मिक लोकनीति** : छत्रपती संभाजी महाराजांनी, छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण पुढे चालू ठेवून अनेक देवस्थाने, मठ, सत्पुरुष यांना वार्षिक नेमणुका (मोईन) पूर्ववत करून दिल्या. याप्रमाणे संभाजी महाराजांनी चिंचवड, मोरगाव, सज्जनगड, चाफळ, शिंगणवाडी, महाबळेश्वर इ. देवस्थानांची व्यवस्था नीट व्हावी म्हणून इनामे, सनदा चालू ठेवल्या. त्यांनी सातारा, चाफळ, सज्जनगड, कराड येथील अधिकाऱ्यांना आज्ञा करून श्रीरामाच्या उत्सवाच्या व्यवस्थेसंबंधी पत्रे पाठविली होती.

**शेवट** - त्यांची एकूण कारकीर्द नऊ वर्षांची. त्या संबंध काळात सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज, वाडीकर सावंत, दळवी यांच्याशी त्यांना मुकाबला करावा लागला. उत्तरेतील अत्यंत प्रबळ शत्रू औरंगजेब याच्याशी मुकाबला करत असतानाच त्यांचा अत्यंत क्रूर रित्या शेवट झाला. शेख मुकर्रबखानाने संभाजी महाराजांस बेसावध स्थितीत किरकोळ चकमकीनंतर संगमेश्वरी कैद केले. तुळापूरजवळील **वढू** येथे दि.११ मार्च, १६८९ रोजी औरंगजेबाने त्यांचा निर्घृणपणे वध केला.

*******

स्रोत सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ









# Events Conducted by Library during May 2026


















# Events Conducted by Library during May 2026

## *2. National Anti-terrorism Day: 21st May 2026*

On 21st May 2026, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 observed National Anti-terrorism Day (दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस) as per the Maharashtra Government GR.

Under the guidance of Respected Principal Prof. Dr. Nivedita Ekbote Madam, the Library Staff took the pledge of 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस'.

The objective of the day is to promote national harmony, mitigate terrorism, and unity among people of all caste, creed, and gender. The day is observed in order to wean away the youth from terrorism and cult of violence by highlighting the sufferings of common people and showing as to how it is prejudicial to the national interest.

The official announcement of National Anti-Terrorism Day was made after the assassination of India's seventh Prime Minister Rajiv Gandhi on 21 May 1991. He was killed in Sriperumbudur, Tamil Nadu in a campaign by a terrorist. Then, under the V.P. Singh government, the centre has decided to observe 21st May as Anti-Terrorism Day.

I am thankful to the library staff members who were present during the programme.

**Regards,**
**Dr.Shantashree Sengupta,**
**Librarian.**

<u>दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाच्या निमित्ताने घ्यावयाची प्रतिज्ञा.</u>

"आम्ही, भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याद्वारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तिनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करत आहोत. आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्व मानवबंधूमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू व वर्धिष्णू करु, तसेच मानवी जिवित आणि मूल्ये धोक्यात आणणाऱ्या विघटनकारी शक्तीचा प्रतिकार करु."

**PLEDGE**

We, the people of India, having abiding faith in our country's tradition of non-violence and tolerance, hereby solemnly affirm to oppose with our strength, all forms of terrorism and violence. We pledge to uphold and promote peace, social harmony, and understanding among all fellow human beings and fight the forces of disruption threatening human lives and values.

# Events Conducted by Library during May 2026







# Events Conducted by Library during May 2026

### *3. Swantantryaveer Savarkar Jayanti: 28th May 2026*

On 28th May 2026, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated 'Swantantryaveer Savarkar Jayanti' as per the Maharashtra Government GR.


Under the guidance of Respected Principal Prof. Dr. Nivedita Ekbote Madam, we all paid our respect to Veer Savarkar.

Principal Madam mentioned that Vinayak Damodar Savarkar is remembered as a lawyer, a poet, an author, a social reformist, a freedom fighter among other things. He was a versatile person with a command in every subject matter he dealt with. Veer Savarkar had unique qualities with very straightforward thoughts based on rational and scientific thinking. He never hesitated to pinpoint age-old wrong practices in the society and had unapologetic, uncompromising nationalism. Veer Savarkar's patriotism was also demonstrated by his unique characteristic as a social reformer.

I am thankful to Vice Principal Prof. Dr. Sachin Sakate and other teaching and non-teaching staff members who were present during the programme.

**Regards,**
**Dr.Shantashree Sengupta,**
**Librarian.**





# Events Conducted by Library during May 2026

### स्वातंत्र्यवीर सावरकर

(दि.२८ मे, १८८३-२६ फेब्रुवारी, १९६६)

(अल्प परिचय)

भारतीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करणारे थोर देशभक्त, साहित्यिक आणि समाजसुधारक. विनायक दामोदर सावरकर हे "स्वातंत्र्यवीर" म्हणून विख्यात आहेत. जन्म नाशिक जवळील भगूर ह्या गावी. सावरकरांचे शिक्षण भगूर, नाशिक, पुणे आणि मुंबई येथे एल.एल.बी.पर्यंत झाले. पुढे "बॅरिस्टर" ही पदवी त्यांनी लंडनला जाऊन घेतली.

सन १८९७ साली पुण्यात आलेल्या प्लेगच्या साथीत इंग्रज सैनिकांनी नागरिकांवर अतोनात अत्याचार केले, त्याचा सूड घेण्यासाठी चापेकर बंधूंनी पुण्याचे कमिशनर रँड ह्याचा खून केला. चापेकर बंधूंना फाशी देण्यात आली. त्यांच्या बलिदानाचा सावरकरांच्या मनावर खोल ठसा उमटला आणि त्यांनी स्वातंत्र्यासाठी सशस्त्र युद्ध करण्याची शपथ घेतली. सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळविण्याच्या उद्देशाने त्यांनी "मित्रमेळा" अर्थात "अभिनव भारत" ची (१९०४) स्थापना केली.

एल.एल..बी. झाल्यानंतर लंडनमध्ये बॅरिस्टरीचे शिक्षण घेण्यासाठी दि.९ जून, १९०६ या दिवशी सावरकरांनी भारताचा किनारा सोडला. लंडनमध्ये असताना "*जोसेफ मॅझिनी यांचे आत्मचरित्र*" लिहीले व *"राजकारण"*(१९०७) हा ग्रंथ अनुवादित केला. "*१८५७ चे स्वातंत्र्यसमर*" या ग्रंथाचे हस्तलिखितही पूर्ण केले ( १९०८). लंडनला सावरकरांच्याबरोबर असलेले *सेनापती बापट* यांनी काही रशियन क्रांतिकारकांच्या साहाय्याने बॉंब तयार करण्याची विद्या आत्मसात केली. ही माहिती भारतात क्रांतिकारकांच्या विविध केंद्रांवर पाठविण्यात आली. सावरकरांनी काही पिस्तुले मिळवून तीही भारतात पाठविली होती.

नाशिकचा ब्रिटिश कलेक्टर जॅक्सन यांच्या खूनामध्ये साहाय्य केल्याचा आरोप ठेवून इंग्रजांनी सावरकरांना दि.१३ मार्च, १९१० रोजी अटक केली. पुढे चौकशीसाठी त्यांना भारतात नेले जात असताना "पोर्ट होल" मधून समुद्रात उडी घेतली आणि ते मार्सेच्या धक्क्यावर फ्रेंच हद्दीत आले. फ्रान्सच्या भूमीवर केलेली अटक कायदेशीर नसल्याची हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयात मागितलेली दादही व्यर्थ ठरली.

सावरकरांना हिंदुस्थानात आणून त्यांच्यावर दोन खटले चालविण्यात आले. जॅक्सनच्या वधाला साहाय्य केल्याचा तसेच अन्य काही आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले होते. या दोन्ही खटल्यांचा निकाल लागून सावरकरांना पन्नास वर्षांच्या जन्मठेपेची शिक्षा झाली. (दि.२४ डिसेंबर, १९१० आणि दि.३० जानेवारी, १९११).

सावरकर हिंदीचे अभिमानी होते. हिंदी भाषेच्या प्रचाराचेही त्यांनी अंदमानात काम केले. हिंदी ही राष्ट्रभाषा झाली पाहिजे, या मताचे ते होते. मात्र, इतर प्रांतांच्या भाषाही शिकल्या पाहिजेत, असे ते सहबंदिवानांना सांगत असत.

सन १९२१ मध्ये सावरकरांना अंदमानामधून हिंदुस्थानात आणण्यात आले आणि रत्नागिरीच्या तुरुंगात ठेवण्यात आले. तिथे त्यांनी "*हिंदुत्व*"(मूळ ग्रंथ इंग्रजी मराठी अनुवाद, १९२५) आणि "*माझी जन्मठेप*" (१९२७) हे ग्रंथ लिहिले. सावरकर हे वृत्तीने कवी होते. "सागरा प्राण तळमळला" ही कविता त्यांना एका तीव्र भावावेगाच्या प्रसंगी सूचली. "सावरकरांची कविता" (१९४३) या नावाने त्यांच्या कविता संकलित करण्यात आल्या आहेत. "रानफुले" (१९३४), "माझ्या आठवणी" (१९४९), "भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने" (१९६३), "शत्रुंच्या शिबिरात" (१९६५) हे त्यांचे अन्य काही उल्लेखनीय ग्रंथ होत. तसेच "शत्रुंच्या शिबिरात" हे आत्मचरित्रात्मक पुस्तक, "मोपल्यांचे बंड अर्थात मला काय त्याचे? " "काळे पाणी" या त्यांच्या दोन कांदबऱ्या व "उःशाप" (१९२७) "संन्यस्त खड्ग" (१९३१) आणि "उत्तरक्रिया" (१९३३) ही त्यांनी लिहिलेली नाटके होत.

अस्पृश्य व उच्चवर्णीय यांच्यात सामाजिक अभिसरण घडून यावे, यावर त्यांच्या अस्पृश्यत: निवारण चळवळीचा विशेष भर होता. अस्पृश्यांना मंदिर प्रवेश बंदी असल्यामुळे त्यांनी सर्वांसाठी प्रवेश असलेले "पतित पावन मंदिर" बांधविले. रत्नागिरीतील विठ्ठल मंदिरात होणाऱ्या गणेशोत्सवात अस्पृश्यांना प्रवेश देणार नाही, अशी भूमिका सनातन्यांनी घेताच सावरकरांनी अखिल हिंदू गणपती स्थापन करून त्याचा उत्सव केला आणि गणेशमूर्तीची पूजा एका सफाई कामगाराच्या हस्ते केली. धर्मांतरितांना पुन्हा हिंदू धर्मात सन्मानपूर्वक प्रवेश देऊन त्यांनी त्यांची लग्ने हिंदू समाजात लावून देण्यासाठी पुढाकार घेतला.

सन १९४३ मध्ये सांगली येथे भरलेल्या नाट्यशताब्दी महोत्सवाचे ते अध्यक्ष होते. त्याच वर्षी त्यांना नागपूर विद्यापीठाकडून डी.लिट्. ही सन्माननीय पदवी देण्यात आली.

सन १९६६ मध्ये मुंबई येथे त्यांची प्रकृती ढासाळली आणि त्यांनी प्रायोपवेशन करुन जीवनाचा अंत करण्याचे ठरविले व त्यातच त्यांचे देहावसान झाले.

******

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)







# Events Conducted by Library during May 2026

## *4. Ahilyadevi Holkar Jayanti: 31st May 2026*

On 31.05.2026, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated 'Ahilyadevi Holkar Jayanti' as per the Maharashtra Government GR.


Under the guidance of Respected Principal Prof. Dr. Nivedita Ekbote Madam, Library Staff paid their respect to Punyashlok Ahilyadevi Holkar.

Maharani Ahilyabai Holkar was the Holkar Queen of the Maratha Malwa kingdom, India. Rajmata Ahilyabai was born in the village of Chondi in Jamkhed, Ahmednagar, Maharashtra. She moved the capital to Maheshwar south of Indore on the Narmada River. She was noted for her piety, for her administrative ability, for her keen interest in all her people and for an extraordinary amount of building holy sites all over the country. Her rule of Malwa in the 18th century is still cited as a model of benevolent and effective government. Her greatest achievement was to rebuild the Kashi Vishwanath Temple in 1780, which was dedicated to Shiva; the presiding deity of the city of Varanasi, one of the holiest Hindu sites of pilgrimage.

I am thankful to the staff members who were present during the programme.

**Regards,**
**Dr.Shantashree Sengupta,**
**Librarian.**





# Events Conducted by Library during May 2026

### अहिल्यादेवी होळकर

(दि.३१ मे, १७२५ - १३ ऑगस्ट, १७९५)

(अल्प परिचय)

एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांचा जन्म चौंडी या छोट्याशा गावात (जिल्हा - अहमदनगर) माणकोजी व सुशीलाबाई शिंदे या दांपत्यापोटी झाला. धनगर समाजात जन्मलेल्या अहिल्याबाईंचे लग्न वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मुलाशी, खंडेरावांशी झाले. अहिल्याबाईंना वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले. पती खंडेराव कुंभेरी येथे लढाईत मरण पावले.

मल्हारराव होळकरांना पेशव्यांनी इंदूर संस्थानची जहागीर दिली होती. सन १७६६ मध्ये त्यांचे निधन झाले आणि अहिल्याबाईंवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली. पुढील अठ्ठावीस वर्षे त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालविला. तिजोरीत भर घालीत त्यांनी प्रजाहिताकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले.

राजधानी इंदूरहून नर्मदातीरी महेश्वरला हलविली (१७७२). तिथे अनेक वास्तू बांधल्या. राजवाड्यात प्रशस्त देवघर होते. नदीवर घाट बांधले. मंदिरांचा जीर्णोद्धार केला.

अहिल्याबाईंनी प्रमुख तीर्थक्षेत्री विशेषतः अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, हृषीकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदेपूर, चौंढी येथे मंदिरे बांधली. यांशिवाय सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन, औंढा नागनाथ, काशी विश्वेश्वर, विष्णुपाद, महाकाळेश्वर आदी मंदिरांचा जीर्णोद्धार केला. वाराणसी, प्रयाग, पुणतांबे, चौंढी, नाशिक, जांब (इंदूर), त्र्यंबकेश्वर येथे नदीला विस्तीर्ण घाट बांधले आणि गोकर्ण महाबळेश्वर, उज्जयिनी, रामेश्वर, भीमाशंकर आदी ठिकाणी अन्नछत्रे उघडली. सप्तपुरे-चार धामे या ठिकाणी घाट, बाग, मंदिरे, कुंडे, धर्मशाळा बांधून यात्रिकांची सोय केली.

अहिल्याबाईंचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मिळ होता. त्यात निर्णयसिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पद्मपुराण, श्रावणमास माहात्म्य इत्यादी ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या.

महेश्वर येथे दि.१३ ऑगस्ट, १७९५ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले.

******

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)







# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING MAY 2026*

| Author | Title |
|---|---|
| • PATIL PURUSHOTTAM | • TUKARAMCHI KATHI तुकारामाची काठी |
| • RATHOD VINOD | • MARATHI KADAMBARI SUCHI ( PRARAMBH TE 2023 ) मराठी कादंबरी सुची (प्रारंभ ते २०२३) |
| • PARAB PRAKASH | • MARATHICHYA UCHHA SHIKSHANCHI DASHA AANI DISHA मराठीच्या उच्च शिक्षणाची दशा आणि दिशा |

# News Paper Clippings : May 2026




Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf* ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into




***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous .***

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

प्रभात

# पदवी प्रवेशाचा कट-ऑफ घसरणार

## ९० टक्के पार करणाऱ्यांच्या संख्येत घट; आजपासून प्रवेशाचा श्रीगणेशा

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ३ - राज्य मंडळाच्या बारावीच्या निकालानंतर आता कॉलेज कॅम्पसमध्ये पदवी प्रवेशाचे वारे वाहू लागले आहेत. यंदा ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाल्याने नामांकित महाविद्यालयांमधील पदवी प्रवेशाचा कट-ऑफ खाली येण्याची शक्यता आहे. दरम्यान, पुणे शहर व जिल्ह्यातील प्रमुख महाविद्यालयांनी सोमवारपासून (दि. ४) बीए, बीकॉम आणि बीएससी या पारंपरिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात केली असून, ऑनलाइन अर्जांची लिंक उद्यापासून खुली होणार आहे.**

राज्य शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, यंदा राज्यातील निकालाचा टक्का तर घटलाच आहे, पण ७५ ते ९० दरम्यान गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची संख्याही कमी झाली आहे. यंदा ७ हजार ५१० विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले. गेल्या वर्षी ही संख्या ८ हजार ३५२ होती. म्हणजेच, टॉप स्कोअरर्सच्या संख्येत तब्बल ८४२ ने घट झाली आहे. तसेच, ४५ ते ६० टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची (४५.०३ टक्के) आहे. त्यामुळे पदवीचा कटऑफ घसरण्याची शक्यता आहे.

### महाविद्यालये सज्ज

निकालानंतर आठवड्याभराने प्रवेश प्रक्रिया सुरू होईल असा पालकांचा अंदाज होता. मात्र, महाविद्यालयांनी निकालाच्या



दुसऱ्या दिवसापासूनच प्रवेश प्रक्रियेला वेग दिला आहे. मॉडर्न महाविद्यालय, स. प. महाविद्यालय, गरवारे महाविद्यालय आणि मराठवाडा मित्र मंडळ (एमएमसीसी) यांसह अनेक संस्थांनी ऑनलाइन अर्ज स्वीकारण्यास सुरुवात केली आहे.

### संकेतस्थळावर माहिती

मॉडर्न महाविद्यालयाचे उपप्राचार्य शामकांत देशमुख यांनी आम्ही सोमवारपासून ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू केल्याचे सांगितले आहे. स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील, गरवारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास उगले, मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्राचार्य डॉ. किशोर निकमसह अन्य प्राचार्यांनी पदवी प्रथम वर्ष प्रवेशास उद्यापासून सुरुवात होईल. सविस्तर माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सध्या ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असली, तरी प्रत्यक्ष प्रवेशाची औपचारिकता मूळ गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला (एलसी) मिळाल्यावरच पूर्ण होईल. ही कागदपत्रे असल्याशिवाय प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे बोर्डाकडून ओरिजनल मार्कलिस्ट मिळताच व महाविद्यालयांकडून एलसी मिळताच खऱ्या अर्थाने पदवी प्रवेशाला गती मिळणार आहे.

### सीईटी निकालाची प्रतीक्षा

पारंपरिक अभ्यासक्रमांचे प्रवेशप्रक्रिया सुरू झाले असले, तरी व्यावसायिक अभ्यासक्रमांकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांचे डोळे अद्याप निकालांकडेच आहेत. सायन्स शाखेतील विद्यार्थी एमएचटी-सीईटीच्या निकालाची वाट पाहात आहेत. कॉमर्समधील विद्यार्थी बीबीए आणि बीसीए यांसारख्या अभ्यासक्रमांच्या सीईटी निकालाकडे लक्ष लावून आहेत. त्यानंतरच विद्यार्थी पदवी प्रवेशाचा विचार करतील.

Pune City Edition
May 04, 2026 Page No. 13
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*


प्रभात

# स्वायत्त महाविद्यालय

**सध्या महाराष्ट्रात अनेक महाविद्यालये ही स्वायत्त होत आहेत. प्रवेश घेते वेळी पालक व विद्यार्थी यांच्या मनामध्ये अनेक संभ्रम व शंका स्वायत्त महाविद्यालया बाबत असतात. हेच लक्षात घेऊन हा लेख लिहिण्याचे प्रयोजन.**

---

केंद्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), नवी दिल्ली यांच्या उच्चशिक्षणाच्या धोरणांनुसार ज्या महाविद्यालयांचे नॅक (NAAC), बंगलोर या संस्थेद्वारे मूल्यांकन झाले असल्यास व ज्या महाविद्यालयांना 'ए', 'ए+' व 'ए++' श्रेणी व दर्जा 'नॅक'कडून प्राप्त असल्यास अशी महाविद्यालये संलग्न विद्यापीठाचे व शासनाच्या उच्चशिक्षण विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करून विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) नवी दिल्लीकडे महाविद्यालयास स्वायत्त दर्जा मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करू शकतात. ज्या महाविद्यालयांना नॅक, बंगलोर या संस्थेकडून 'ए', 'ए+' व 'ए++' श्रेणी आहे अशा महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोगाकडून तज्ज्ञ समितीच्या भेटी शिवाय स्वायत्त दर्जा बहाल केला जातो.




महाविद्यालयांना स्वायत्तता बहाल करण्यामागे केंद्र शासन व विद्यापीठ अनुदान आयोगाची नेमकी काय भूमिका आहे ते समजावून घेऊयात. स्वायत्त महाविद्यालयांना शैक्षणिक स्वातंत्र्य दिल्याने ते गरजेप्रमाणे अद्यावत अभ्यासक्रम, विषयास अनुसरून परीक्षा पद्धत व संशोधनाला चालना मिळेल. उत्तम मनुष्यबळ निर्माण होण्यास मदत होईल व त्यातूनच देशाची प्रगती होऊ शकते हे ओळखून महाविद्यालयांची स्वायत्तता ही संकल्पना पुढे आली.

अनेक महाविद्यालये विविध अभ्यासक्रमाचे कट ऑफ हे ९०% हून अधिक असतात पण महाविद्यालये स्वायत्त नसतील तर विद्यापीठाने घालून दिलेलाच अभ्यासक्रम व मूल्यांकन पद्धत अवलंबवली जाते. वास्तविक पाहता ९०% हून जास्त गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे अभ्यासक्रमात काठिण्य पातळी का स्वीकारण्यात येऊ नये हीदेखील एक महत्त्वाची भूमिका महाविद्यालयांना स्वायतत्ता देण्यामागे आहे हे विसरून चालणार नाही.

उदाहरण द्यायचे झाल्यास ज्या विद्यार्थ्याला १२वी कॉमर्सला ९२% गुण आहेत व महाविद्यालयाचा बी.कॉम. या अभ्यासक्रमाचा कट ऑफ हा ९०% आहे. अशा महाविद्यालयांनी विद्यापीठाने घालून दिलेल्या सर्वसाधारण अभ्यासक्रमाचे अवलंबन करण्यापेक्षा स्वतंत्र वेगळा अभ्यासक्रम तयार करण्याची मुभा ही स्वायत्त महाविद्यालयांना प्राप्त होते. थोडक्यात ४०% गुण असलेल्या विद्यार्थ्याला जो अभ्यासक्रम तोच अभ्यासक्रम ९२% गुण मिळवलेल्या विद्यार्थ्याला अवलंबवला जातो. त्यामुळे त्यांच्या क्षमतेप्रमाणे तो नसतो त्यामुळे कुठेतरी असे ऐकण्यास मिळते की, औद्योगिक क्षेत्राच्या गरजेप्रमाणे मनुष्यबळ निर्माण केले जात नाही हे सातत्याने बोलले जाते. औद्योगिक व सेवाक्षेत्राची मनुष्यबळाची गरज व पुरवठ्यामध्ये तफावत असते. ही तफावत कमी करण्याच्या दृष्टिकोनातून महाविद्यालयांची स्वायत्तता महत्त्वाची ठरेल असे वाटते.

स्वायत्तता बहाल झाल्यानंतर अशी महाविद्यालये ही कायम संबंधित विद्यापीठाशी संलग्न असतात हे लक्षात घेणे खूप गरजेचे आहे. याबाबतीत पालक व विद्यार्थी वर्गात मोठा संभ्रम असतो. अशा स्वायत्त महाविद्यालयातून पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्यास महाविद्यालय व विद्यापीठांकडून संयुक्तरित्या पदवी प्रमाणपत्र विद्यार्थ्याला बहाल करण्यात येते व प्रत्येक गुणपत्रकावर संबंधित महाविद्यालय व विद्यापीठ असा दोन्हीचा स्पष्ट उल्लेख असतो. स्वायत्त महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास पदवी हे संबंधित विद्यापीठाचीच मिळते. स्वायत्त महाविद्यालयांना पदवी बहाल करण्याचा अधिकार नसतो हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

काही स्वायत्त महाविद्यालयांशी कनिष्ठ महाविद्यालय (११वी, १२वी वर्ग) जोडलेली असतात असे जरी असल्यास अशा कनिष्ठ महाविद्यालयांचा स्वायत्त महाविद्यालयाशी कोणताही संबंध नसतो. थोडक्यात, स्वायत्तता ही वरिष्ठ महाविद्यालयास म्हणजे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमापुरती मर्यादित असते. कनिष्ठ महाविद्यालय हे संबंधित उच्च माध्यमिक मंडळाशी संलग्न असतात.

**- शामकांत देशमुख,**
**उपप्राचार्य**

Pune City Edition
May 18, 2026 Page No. 8
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

प्रभात




# स्वायत्त महाविद्यालय

**स्वायत्त महाविद्यालय स्थानिक, राज्य, राष्ट्रीय व जागतिक पातळीवरची गरज ओळखून नवनवे अभ्यासक्रम तयार करून मनुष्यबळ निर्मितीत भरीव योगदान देऊ शकतात. ठराविक साचेबद्ध, सर्वसमावेशक पद्धतीने बनवलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यापेक्षा आपल्या कुवतीप्रमाणे नावीन्यपूर्ण व काळानुरूप बदल केलेला अभ्यासक्रम स्वीकारणे विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने अत्यंत हिताचे ठरते.**

स्वायत्त महाविद्यालय व विद्यापीठ यांचे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम स्वतंत्र व वेगळे असतात. हे ठरविताना विद्यापीठांना शहरी, ग्रामीण, आदिवासी भाग, सर्वसाधारणपणे उपलब्ध पायाभूत सुविधा, भौगोलिक परिस्थिती विचारात घ्यावी लागते. तर स्वायत्त महाविद्यालय त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा, भौगोलिक परिस्थिती, मनुष्यबळ याबाबी विचारात घेऊन पदवी पदव्युत्तर अभ्यासक्रम ठरवितात. त्यामुळे जास्त प्रभावीपणे अंमलबजावणी करणे सोपे जाते.

उदाहरण द्यायचे झाल्यास बी.कॉम.चा अभ्यासक्रम विद्यापीठाचा वेगळा असेल तर स्वायत्त महाविद्यालयाचा वेगळा असेल. तर नव्याने सीएसटी सारखी संकल्पना आल्यास तत्काळ स्वायत्त महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमात तिचा अंतर्भाव करणे शक्य होते व त्या क्षेत्राची मनुष्यबळाची गरज भागविता येते. अशी उदाहरणे प्रत्येक शाखेबाबत देता येतील.

स्वायत्त महाविद्यालयांना त्यांची परीक्षा पद्धत राबविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. गुणपद्धतीचा अवलंब करावा की श्रेयांक पद्धतीचे अवलंबन करावे. वर्षाअखेरीस परीक्षा घेण्यापेक्षा सातत्याने ठराविक अंतराने सातत्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मूल्यमापन होणे खूप फायद्याचे व हिताचे ठरते. अशाप्रकारे अभ्यासक्रमाच्या विषयानुसार स्वतंत्र मूल्यमापन पद्धतीचा अवलंब करता येतो उदा. MCQ Test, Quiz, Subjective Test, Open Book Test, Project, Seminar, Presentations, Case Studies, Home Assignments, Field Visit, Survey Report इत्यादी. अशा पद्धती व त्याचे अवलंबन करण्याचे स्वातंत्र्य विद्यापीठाच्या अभ्यासक्रमासाठी वापरता येत नाही. ठरवून दिलेल्या पद्धतीप्रमाणेच परीक्षा व मूल्यांकन करावे लागते.

सातत्याने विविध प्रकारच्या परीक्षामधून संबंधित विषयाच्या ज्ञानाबाबत मूल्यांकन होत असल्याने विद्यार्थी कायम अभ्यासात कार्यमग्न राहतात. त्यांची आवड व रुची वाढते. त्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण करताना ते स्वतःला झोकून देऊन प्रयत्न करतात. यामुळे विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती वाढते. सहयोगी विद्यार्थ्यांबरोबर वार्तालाप, चर्चा, विचारांची देवाणघेवाण होते. संघटन कौशल्य विकसित होण्यासाठी मदत होते. आपापसात निकोप स्पर्धा निर्माण होते. याचा अंतिम परिणाम चांगला होतो.

स्वायत्त महाविद्यालयात प्रवेश घेताना विद्यापीठाचे व शासनाचे सर्व निकष, मार्गदर्शक तत्त्वे, बिंदूनामावली यांचे पालन करणे क्रमप्राप्त असते. विद्यापीठ तसेच शासनाच्या सर्व शिष्यवृत्ती व कल्याणकारी योजना यांचा लाभ घेता येतो.

नजीकच्या काळात अनेक महाविद्यालये स्वायत्ततेचा पर्याय निवडतील. पालक, विद्यार्थी व नोकरी देणाऱ्या संस्था, कंपन्या या प्राधान्याने स्वायत्त महाविद्यालयाकडे प्रवेशाच्या दृष्टीने व रोजगार निर्मितीचे केंद्र म्हणून आकर्षित होतील यात शंका नाही.

**– शामकांत देशमुख,**
**उपप्राचार्य**

Pune City Edition
May 25, 2026 Page No. 8
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

लोकमत

**राज्यातील लाखो विद्यार्थ्यांपुढे एकच प्रश्न असतो, दहावी-बारावी झाली, आता पुढे काय ? करिअरच्या दृष्टीने हे वर्ष महत्त्वाचे असते. योग्य अभ्यासक्रम निवडणे, त्यात आपण इतरांपेक्षा वेगळे कसे ठरू यासाठी काम करणे, आवडीच्या विभागाशी संबंधित नवनवे डिजिटल सर्टिफिकेट कोर्स करणे, त्यासाठी मूक, स्वयंसारखे ऑनलाइन व्यासपीठ वापरणे आवश्यक आहे. यातून आपल्यात नवनव्या क्षमता विकसित केल्यास भविष्य उज्ज्वल होईल. तेव्हा आपली आवड, कल आणि कुवत ओळखून योग्य करिअरचा पर्याय निवडणे आवश्यक आहे. संगणक क्षेत्रात करिअर करू पाहणाऱ्यांसाठी अफाट संधी आहेत.**

# संगणक क्षेत्रात तरुणांना अफाट संधी !

### संगणक विश्व



**प्रा. शामकांत देशमुख,**
तज्ज्ञ मार्गदर्शक



आजचे जग संगणकाचे आणि माहिती तंत्रज्ञानाचे आहे. या तंत्रज्ञानाच्या युगात सर्वांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. बऱ्याचदा पालकांना असे वाटते की, आपला पाल्य घरातील संगणक व मोबाईल सहजगत्या हाताळतो, त्यावरील विविध गेम, ॲप्लिकेशन्सचा वापर करतो, म्हणजे तो भविष्यात निश्चितच संगणक क्षेत्रात चांगले करिअर करेल आणि त्या पाल्याचा या क्षेत्राकडे जाण्याचा कल आहे, असे आराखडे बांधले जातात. खरंतर संगणक व संगणकावरील विविध प्रणाली वापरणे किंवा हाताळणे याचा अर्थ संगणक क्षेत्रात उत्तम करिअर करता येईल असा होत नाही हे प्रथम लक्षात घेणे गरजेचे आहे. संगणक, माहिती तंत्रज्ञान व माहिती दळणवळण तंत्रज्ञानाच्या युगात संगणक वापरण्याचे व हाताळण्याचे ज्ञान सर्वांनी घेणे क्रमप्राप्त झाले आहे. हे ज्ञान मिळविण्यासाठी महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (एमकेसीएल) च्या माध्यमातून एमएस-सीआयटी हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर ॲडव्हान्स डिप्लोमाचे पर्याय खुले आहेत. महाराष्ट्र शासनाने या अभ्यासक्रमाला मान्यता दिली असून, सर्व कर्मचाऱ्यांना तसेच नव्याने सेवेत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना हा अभ्यासक्रम पूर्ण करणे सक्तीचे केले आहे. यात संगणकाचे बेसिक ज्ञान, ऑपरेटिंग सिस्टीम, मायक्रोसॉफ्ट ऑफिस मधील एमएस-वर्ड, एमएस-एक्सेल, एमएस-पॉवर पॉइन्ट, एमएस-ॲक्सेस या प्रणालीचा अभ्यास होतो. तसेच इंटरनेटचा वापर सर्चिंग, ब्राउझिंग व ई-मेल या गोष्टी कशा प्रकारे कराव्यात, हाताळाव्यात हे समजते.

### दोन्ही क्षेत्रात नोकरी

१० वीच्या परीक्षेनंतरच्या सुट्टीत हा अभ्यासक्रम पूर्ण करणे सोयीचे ठरते. त्याच्या प्रवेशासाठी एमकेसीएलच्या कोणत्याही केंद्रात प्रवेश घेता येतो. या अभ्यासक्रमाची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने एमकेसीएल घेते व अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र दिले जाते. शासकीय तसेच खासगी क्षेत्रात नोकरी करताना हा अभ्यासक्रम पूर्ण असणे आवश्यक झाले आहे, तर काही ठिकाणी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना नोकरी मिळते असा अनुभव आहे.

### पर्याय काय ?

१ दहावीनंतर संगणक क्षेत्रात करिअर करण्यासाठी संगणक अभियांत्रिकी पदविका किंवा माहिती तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमांचा पर्याय विद्यार्थ्यांसमोर असतो. हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असतो व त्याचे प्रवेश केंद्रीय पद्धतीने तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत केले जाते. बरेच पालक विद्यार्थ्यांना दहावीला जास्त गुण मिळाल्यास तसेच इतरांच्या अनुभवावरून अकरावी-बारावी (विज्ञान) जेईई/एमएच-सीईटी प्रवेश परीक्षा त्यातील संभाव्य धोके लक्षात घेऊन दहावीच्या परीक्षेत मिळालेल्या मार्कांवर अभियांत्रिकी पदविकाचा पर्याय निवडता येतो.

**२ डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर मात्र बीई/बीटेक अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश मिळतो, पण त्यासाठी डिप्लोमा अभ्यासक्रमास किमान ८० टक्क्यांहून अधिक गुण असल्यास चांगल्या महाविद्यालयाचा पर्याय मिळतो. तुलनेने द्वितीय वर्षाच्या जागा अभियांत्रिकी महाविद्यालयात कमी उपलब्ध असतात व त्या महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या निकालावरून ठरतात व सध्या सीबीसीएस श्रेयांक पद्धतीमुळे बीई/बीटेकचे निकाल उत्तम लागत असल्याने द्वितीय वर्षात कमी जागा उपलब्ध असतात. त्यामुळे काही वेळेस डिप्लोमाला चांगले गुण मिळूनही पसंतीचे / आवडीचे महाविद्यालय मिळणे विद्यार्थ्यांना अवघड जाते.**

३ काही विद्यार्थी बीई/ बीटेकच्या दुसऱ्या वर्षात प्रवेश न घेता प्रथम वर्षाच्या पर्यायाचा विचार करतात; पण त्यामध्ये त्यांचे एक वर्ष वाया जाते अथवा जास्तीचे लागते. डिप्लोमानंतर बीएस्सी कॉम्प्युटर, बीसीएचा पर्याय देखील पदवीधर होण्याच्या दृष्टीने उपलब्ध असतात. डिप्लोमानंतर बीएस्सी, बीएस्सी कॉम्प्युटर व बीसीएला द्वितीय वर्षात प्रवेश घेता येतो. पदवी नंतर एमसीए व एमएस्सीचे पर्याय उपलब्ध असतात.

**४ दहावीनंतर परंपरागत अकरावी, बारावी करण्याचा पर्याय निवडल्यास विज्ञान शाखेंतर्गत संगणक, माहिती तंत्रज्ञान, एआयडीएस, एआयएमएल द्विलक्षी अभ्यासक्रमाचे पर्याय असतात.**

५ वाणिज्य शाखेंतर्गत माहिती तंत्रज्ञान हा एक विषय निवडता येतो. बारावी विज्ञान शाखेतील संगणक, इलेक्ट्रॉनिक शास्त्र हे पर्याय विषय निवडल्यास बारावीनंतर पदविकाच्या द्वितीय वर्षात थेट प्रवेश घेता येतो. तसेच अभियांत्रिकी क्षेत्रात करिअर करण्याच्या दृष्टीने हे ज्ञान उपयोगी ठरते. संगणक क्षेत्रात करिअर करताना अकरावी व बारावी विज्ञान शाखेतूनच करावे असे नाही, बारावी विज्ञान, वाणिज्य व कला यानंतरचे पर्याय आपण जाणून घेऊ.

**६ संगणकशास्त्र व गणित या दोन्ही विषयांचा अतिशय जवळचा संबंध असतो. पाल्यांची विश्लेषणात्मक क्षमता आणि तार्किक विचारशक्तीचा कल लक्षात घेऊन अभ्यासक्रम निवडणे योग्य ठरते. बी.एस्सी. (ॲनिमेशन) या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना जाहिरात, मोबाईल गेम्स, मोबाईल ॲप्स, ई-लर्निंग, ग्राफिक्स डिझाइन, ई-सामग्री विकास, बॉलीवूड उद्योग, डिजिटल मार्केटिंग आदी क्षेत्रात चांगल्या संधी उपलब्ध आहेत.**

विद्यार्थ्यांना मुळात चित्रकलेची आवड असेल त्या विद्यार्थ्यांसाठी हा चांगला पर्याय उपलब्ध असू शकतो. हे सर्व अभ्यासक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये उपलब्ध असतात. डिजिटल इंडियासारखे उपक्रम युवकांना प्रोत्साहित करतात.

Hello Pune
Page No. 7 May 26, 2026
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# 5.74L students across state get colleges in CAP round 1

### Seats Can Be Confirmed By June 3 Before Next Cycle

Ardhra.Nair@timesofindia.com

**Pune:** As many as 5.74 lakh students were given allotments in the first merit list for admissions to first-year junior colleges (FYJC) across Maharashtra on Friday. The allotment list was announced by Centralised Admission Process (CAP) committee against an intake capacity of 21.98 lakh. Students allotted colleges can confirm their admissions until June 3.

Parent Shashank Joshi said that while the process was smooth from the govt side, there were minor hiccups at the college level. "My son came to know last night that he was allotted the college which was his first preference. We confirmed the admission at the college, but there were glitches. For example, the school has not yet released the SSC marksheet and leaving certificate. Apparently, students are supposed to upload an undertaking on the portal, but it was never told to us. We wasted some time in college trying to upload this to the admission portal. Had we known earlier, we would have done it at home," Joshi said.

The SSC results were announced on May 8, and board officials told **TOI** that the physical marksheets would be released next week. Compared to the last year, the allotment list was announced over a month in advance.

Nivedita Ekbote, principal of Modern College of Arts, Science and Commerce, said, that they have deputed teachers to help parents and students who come in for admissions. "Since today is the first day of allotment, the number of admissions is low. We are expecting higher numbers on Monday," she added.

Mahesh Palkar, director of Secondary and Higher Secondary Education, said that students should not rely only on SMS and should log in to the website and click on the CAP allotment status option to check if they have been allotted colleges.

Students who have not been allotted a junior college in the first merit list should again lock their admission form Part 2 by filling in the junior college preference order in the second round, considering the marks obtained in Std X and the first cut-off marks of the junior college they wish to join.

### WHAT SHOULD BE DONE BY WEDNESDAY



File photo

- Students have to confirm their admission to the college allotted to them by June 3
- During the same period, the processes for document verification and fee payment will take place
- Students are required to secure admission at the specific college allotted to them in the merit list
- Those who did not receive an allotment based on their order of preference may apply in the second admission round
- A list of allotted students has been sent to every college for publication on their respective websites
- The schedule for the second admission round will be announced on June 5

| Boardwise allotment | Science | Commerce | Arts | Total |
|---|---|---|---|---|
| State Board | 2,88,477 | 1,14,911 | 1,22,773 | 5,26,161 |
| CBSE | 28,379 | 6,267 | 1, 325 | 35, 971 |
| CISCE | 5,350 | 3,935 | 816 | 10,101 |
| IB | 11 | 9 | 6 | 26 |
| IGCSE | 485 | 329 | 117 | 931 |
| NIOS | 44 | 53 | 53 | 150 |
| Others | 685 | 586 | 332 | 1,603 |
| Total | 1,26,090 | 1,25,422 | 5,74,942 | 3,23,431 |

| Faculties Allotment | |
|---|---|
| Science | 3,23,431 |
| Commerce | 1,26,090 |
| Arts | 1,25,422 |
| Total | 5,74,943 |

In First Round

| Region | Intake | CAP Locked | Alloted |
|---|---|---|---|
| Amravati | 2,01,215 | 87,992 | 58,686 |
| Chhatrapati Sambhajinagar | 3,19,045 | 97,944 | 64,868 |
| Kolhapur | 2,02,980 | 94,773 | 54,770 |
| Latur | 1,54,090 | 51,300 | 33,674 |
| Mumbai | 4,77,210 | 2,12,917 | 1,33,323 |
| Nagpur | 2,24,995 | 77,453 | 54,937 |
| Nashik | 2,22,865 | 1,02,907 | 65,064 |
| Pune | 3,96,266 | 1,72,791 | 1,09,623 |
| Total | 21,98,666 | 8,87,264 | 5,74,945 |

> If students want to confirm their admission in the allotted junior college, they should go to their login and click on the upload document option to post their documents and confirm their consent in CAP Admission by clicking on the proceed for admission option and visit the concerned junior college in person within the prescribed period to confirm their admission
>
> **– Mahesh Palkar** | DIRECTOR OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION

The Times of India 30.5.2026

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# पुढारी

# अकरावी प्रवेशाचा कटऑफ वाढला

### नामांकित महाविद्यालयांत प्रवेशासाठी चुरस

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पुण्यातील नामांकित कनिष्ठ महाविद्यालयांच्या अकरावी प्रवेशाच्या पहिल्या फेरीतील कटऑफ गुणांमध्ये ८ ते १४ गुणांची मोठी वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे. नामांकित महाविद्यालयांचे कटऑफ ४७० ते ४८० गुणांच्या पुढे गेले असून, दहावीचा वाढलेला निकाल, सीबीएसई-आयसीएसई बोर्डातील विद्यार्थ्यांची संख्या आणि मर्यादित जागा यामुळे प्रवेशासाठी चुरस वाढल्याचे दिसून येत आहे. यंदा विज्ञान आणि वाणिज्य शाखांमध्ये प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठी स्पर्धा पाहायला मिळत आहे.

बीएमसीसीने वाणिज्य शाखेत पुन्हा आघाडी कायम ठेवत ४८२ गुणांचा कटऑफ नोंदवला. फर्ग्युसन कॉलेजच्या कला शाखेचाही कटऑफ ४८२ पर्यंत पोहोचला आहे. विज्ञान शाखेत महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे ज्युनिअर कॉलेज, एसपी कॉलेज, एमईएस गरवारे कॉलेज, नेस वाडिया महाविद्यालय आणि मॉडर्न कॉलेज यांसारख्या महाविद्यालयांमध्ये मोठी स्पर्धा दिसून आली. गेल्या वर्षीच्या तुलनेत बहुतांश महाविद्यालयांचे कटऑफ ८ ते १४ गुणांनी वाढले आहेत. विद्यार्थ्यांचा विज्ञान आणि वाणिज्य शाखांकडे वाढता कल, तसेच गुणवंत विद्यार्थ्यांची वाढलेली संख्या यामुळे कटऑफमध्ये वाढ झाल्याचे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.



### कॉलेजनिहाय शाखानुसार कटऑफ २०२६

| महाविद्यालय | कला | वाणिज्य | विज्ञान |
|---|---|---|---|
| फर्ग्युसन कॉलेज | ४८२ | ४७४ | ४७८ |
| बीएमसीसी | - | ४८२ | - |
| एमईएस गरवारे कॉलेज | ४५८ | ४६५ | ४७८ |
| नौरोसजी वाडिया कॉलेज | ४४८ | ४६२ | ४७७ |
| मॉडर्न कॉलेज | ४४५ | ४६० | ४७५ |
| सिम्बायोसिस ज्यु. कॉलेज | ४४२ | ४६८ | ४७४ |
| एसपी कॉलेज | ४५० | ४६४ | ४७२ |
| नेस वाडिया कॉलेज | - | ४७० | - |
| एमटीईएस ज्यु कॉलेज | ४५२ | ४६६ | ४८१ |

### कटऑफ तुलना

| महाविद्यालय | शाखा | २०२५ | २०२६ | वाढ |
|---|---|---|---|---|
| बीएमसीसी | वाणिज्य | ४७२ | ४८२ | +१० |
| फर्ग्युसन कॉलेज | कला | ४७४ | ४८२ | +८ |
| गरवारे कॉलेज | विज्ञान | ४६८ | ४७८ | +१० |
| नौरोसजी वाडिया | विज्ञान | ४६६ | ४७७ | +११ |
| मॉडर्न कॉलेज | विज्ञान | ४६२ | ४७५ | +१३ |
| सिम्बायोसिस | विज्ञान | ४६१ | ४७४ | +१३ |
| एसपी कॉलेज | विज्ञान | ४५८ | ४७२ | +१४ |
| नेस वाडिया कॉलेज | वाणिज्य | ४५९ | ४७० | +११ |

My Pune Edition
May 30, 2026 Page No. 01
Powered by: erelego.com

# लोकमत

# पुणे शहरामधील महाविद्यालयांचा 'भाव' वाढत चालल्याचे चित्र स्पष्ट

### ११वी प्रवेशाची पहिली यादी प्रसिद्ध; कट ऑफमध्ये वाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : अकरावी प्रवेशाच्या पहिल्या फेरीतील कटऑफ गुणांमध्ये यंदा ८ ते १४ गुणांची वाढ झाल्याचे दिसून येत आहे. यात पुण्यातील नामांकित कनिष्ठ महाविद्यालयाचे कटऑफ ४७० ते ४८० गुणांच्या पुढे गेले आहे. दहावीचा वाढलेला निकाल, सीबीएसई-आयसीएसई बोर्डातील विद्यार्थ्यांची संख्या आणि मर्यादित जागा यामुळे प्रवेशासाठी चुरस वाढल्याचे दिसत आहे.

विशेषतः विज्ञान आणि वाणिज्य शाखांमध्ये प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठी स्पर्धा पाहायला मिळत आहे. यात बीएमसीसी महाविद्यालयाने वाणिज्य शाखेत आघाडी कायम ठेवत ४८२ गुणांचा कटऑफ नोंदवला आहे.

तसेच फर्ग्युसन कॉलेजच्या कला शाखेचा कटऑफ ४८२ पर्यत पोहोचला आहे. विज्ञान शाखेत महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे ज्युनिअर कॉलेज, एसपी कॉलेज, एमईएस गरवारे कॉलेज, नेस वाडिया महाविद्यालय आणि मॉडर्न कॉलेज यांसारख्या महाविद्यालयांमध्ये मोठी स्पर्धा पाहायला मिळत आहे. त्यामुळे अपेक्षित महाविद्यालयात प्रवेशासाठी पालक आणि विद्यार्थ्यांची धावपळ सुरू आहे.

### महाविद्यालय अन् शाखानुसार कट ऑफ

| महाविद्यालय | कला | वाणिज्य | विज्ञान |
|---|---|---|---|
| फर्ग्युसन कॉलेज | ४८२ | ४७४ | ४७८ |
| बीएमसीसी | ०० | ४८२ | ०० |
| एमईएस गरवारे कॉलेज | ४५८ | ४६५ | ४७८ |
| नौरोसजी वाडिया कॉलेज | ४४८ | ४६२ | ४७७ |
| मॉडर्न कॉलेज | ४४५ | ४६० | ४७५ |
| सिम्बॉयोसिस ज्युनिअर कॉलेज | ४४२ | ४६८ | ४७४ |
| एसपी कॉलेज | ४५० | ४६४ | ४७२ |
| नेस वाडिया कॉलेज | ०० | ४७० | ०० |
| एमटीईएस ज्युनिअर कॉलेज | ४५२ | ४६६ | ४८१ |

### गतवर्षीच्या तुलनेत कट ऑफ यानुसार

| महाविद्यालय | शाखा | २०२५ | २०२६ | वाढ |
|---|---|---|---|---|
| बीएमसीसी | वाणिज्य | ४७२ | ४८२ | १० |
| फर्ग्युसन कॉलेज | कला | ४७४ | ४८२ | ८ |
| गरवारे कॉलेज | विज्ञान | ४६८ | ४७८ | १० |
| नौरोसजी वाडिया कॉलेज | विज्ञान | ४६६ | ४७७ | ११ |
| मॉडर्न कॉलेज | विज्ञान | ४६२ | ४७५ | १३ |
| सिम्बॉयोसिस | विज्ञान | ४६१ | ४७४ | १३ |
| एसपी कॉलेज | विज्ञान | ४५८ | ४७२ | १४ |
| नेस वाडिया कॉलेज | वाणिज्य | ४५९ | ४७० | ११ |

### कटऑफ आठ ते १४ गुणांनी वाढले

गेल्या वर्षीच्या तुलनेत बहुतांश नामांकित कॉलेजांचे कटऑफ आठ ते १४ गुणांनी वाढले आहेत. यात विद्यार्थ्यांचा विज्ञान आणि वाणिज्य शाखांकडे वाढता कल, गुणवंत विद्यार्थ्यांची वाढलेली संख्या आदींमुळे कटऑफमध्ये वाढ झाल्याचे तज्ज्ञ सांगत आहेत.

Hello Pune
Page No. 3 May 30, 2026
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

प्रभात

## नामांकित महाविद्यालयामध्ये प्रवेशासाठी तीव्र चुरस

### अकरावी प्रवेश; पहिल्या फेरीची कटऑफ यादी जाहीर

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २९** - शहरातील नामांकित कनिष्ठ महाविद्यालयांच्या अकरावी प्रवेशाच्या पहिल्या फेरीची कटऑफ यादी जाहीर झाली असून, यंदा कटऑफ गुणांमध्ये तब्बल ८ ते १४ गुणांची मोठी वाढ झाली आहे. यंदा दहावीचा निकाल मोठ्या प्रमाणावर वाढल्याने आणि सीबीएसई, आयसीएसई बोर्डाच्या गुणवंत विद्यार्थ्यांची संख्या अधिक असल्याने प्रवेशासाठी चुरस निर्माण झाली आहे. बहुतांश नामांकित महाविद्यालयांचे कटऑफ थेट ४७० ते ४८० गुणांच्या पार गेल्याने विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा पाहायला मिळत आहे.

वाणिज्य शाखेत बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सने (बीएमसीसी) ४८२ गुणांचा उच्चांकी कटऑफ नोंदवत आपले अव्वल स्थान कायम राखले आहे. दुसरीकडे, फर्गसन महाविद्यालयाच्या कला शाखेचा कटऑफदेखील ४८२ गुणांवर पोहोचल्याने कला शाखेची क्रेझही वाढल्याचे स्पष्ट झाले आहे. विज्ञान शाखेत महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे ज्युनिअर कॉलेज, एसपी कॉलेज, एमईएस गरवारे कॉलेज, नेस वाडिया महाविद्यालय आणि मॉडर्न कॉलेजसारख्या प्रमुख महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांची धावपळ सुरू आहे. मर्यादित जागा आणि विद्यार्थ्यांचा विज्ञान-वाणिज्य शाखांकडे वाढलेला कल, यामुळे यंदा स्पर्धा तीव्र झाल्याचे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे. पहिल्या फेरीत संधी हुकलेल्या विद्यार्थ्यांना आता पुढील फेऱ्यांवर अवलंबून राहावे लागणार आहे.

**कटऑफ तुलनात्मक गुणांची आकडेवारी**

| महाविद्यालय | शाखा | २०२५ | २०२६ | वाढ |
|---|---|---|---|---|
| बीएमसीसी | वाणिज्य | ४७२ | ४८२ | +१० |
| फर्गसन कॉलेज | कला | ४७४ | ४८२ | +८ |
| गरवारे कॉलेज | विज्ञान | ४६८ | ४७८ | +१० |
| नौरोसजी वाडिया कॉलेज | विज्ञान | ४६६ | ४७७ | +११ |
| मॉडर्न कॉलेज | विज्ञान | ४६२ | ४७५ | +१३ |
| सिम्बायोसिस | विज्ञान | ४६१ | ४७४ | +१३ |
| एसपी कॉलेज | विज्ञान | ४५८ | ४७२ | +१४ |
| नेस वाडिया कॉलेज | वाणिज्य | ४५९ | ४७० | +११ |

Pune City Edition
May 30, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

## पुण्यात अकरावी प्रवेशाची चुरस वाढली!

### 'बीएमसीसी' वाणिज्य आणि 'फर्ग्युसन' कला शाखेत ४८२ गुणांसह अव्वल स्थानी

**पुणे** : पुण्यातील नामांकित कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता अकरावी प्रवेशाच्या पहिल्या फेरीअखेर विद्यार्थ्यांमध्ये मोठी चुरस पाहायला मिळत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कटऑफ गुणांमध्ये तब्बल ८ ते १४ गुणांची मोठी वाढ झाली आहे. शहरातील नामांकित महाविद्यालयांचे कटऑफ यंदा थेट ४७० ते ४८० गुणांच्याही पुढे गेले आहेत. दहावीच्या निकालात वाढलेली गुणवंतांची संख्या, सीबीएसई व आयसीएसई बोर्डातील विद्यार्थ्यांचा वाढलेला ओघ आणि नामांकित महाविद्यालयांमधील मर्यादित जागा या त्रिसूत्रीमुळे यंदा प्रवेशाची स्पर्धा अटीतटीची झाली आहे.

**बीएमसीसी आणि फर्ग्युसनचा दबदबा कायम**

वाणिज्य शाखेत बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सने (बीएमसीसी) आपली आघाडी कायम राखत तब्बल ४८२ गुणांचा उच्चांकी कटऑफ नोंदवला आहे. तर कला शाखेत फर्ग्युसन महाविद्यालयाचा कटऑफ देखील ४८२ गुणांवर पोहोचला आहे. विज्ञान शाखेत महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे (एमटीईएस) कनिष्ठ महाविद्यालय ४८१ गुणांसह आघाडीवर असून, त्याखालोखाल फर्ग्युसन महाविद्याय आणि एमईएस गरवारे महाविद्याय ४७८ गुणांवर स्थिरावले आहेत.

विद्यार्थ्यांचा कल प्रामुख्याने विज्ञान आणि वाणिज्य शाखांकडे अधिक असल्याचे दिसून येत असून, या दोन्ही शाखांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी दशांश गुणांसाठीही चढाओढ सुरू आहे.

**महाविद्यालयनिहाय व शाखानिहाय कटऑफ**

| महाविद्यालय | कला | वाणिज्य | विज्ञान |
|---|---|---|---|
| फर्ग्युसन महाविद्यालय | ४८२ | ४७४ | ४७८ |
| बीएमसीसी महाविद्यालय | | ४८२ | |
| एमटीईएस महाविद्यालय | ४५२ | ४६६ | ४८१ |
| गरवारे महाविद्यालय | ४५८ | ४६५ | ४७८ |
| नौ. वाडिया महाविद्यालय | ४४८ | ४६२ | ४७७ |
| मॉडर्न महाविद्यालय | ४४५ | ४६० | ४७५ |
| सिम्बायोसिस महाविद्यालय | ४४२ | ४६८ | ४७४ |
| एसपी महाविद्यालय | ४५० | ४६४ | ४७२ |
| नेस वाडिया महाविद्यालय | | ४७० | |

Kesari 30.5.2026

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*


पुण्य नगरी

# शहरात अकरावी प्रवेशासाठी चढाओढ

**पुणे :** पुणे शहरातील नामांकित कनिष्ठ महाविद्यालयांच्या अकरावी प्रवेशाच्या पहिल्या फेरीतील कटऑफ गुणांमध्ये ८ ते १४ गुणांची मोठी वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे. महाविद्यालयांचे कटऑफ गुण ४७० ते ४८० गुणांच्या पुढे गेले आहेत. दहावीच्या निकालात यंदा घट झाली असली तरी सीबीएसई-आयसीएसई बोर्डातील विद्यार्थ्यांची संख्या आणि मर्यादित जागा यामुळे प्रवेशासाठी चुरस वाढल्याचे दिसत आहे. विज्ञान आणि वाणिज्य शाखांमध्ये प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठी स्पर्धा पाहायला मिळणार आहे.शहरातील बीएमसीसी महाविद्यालयाने वाणिज्य शाखेत पुन्हा आघाडी कायम ठेवत ४८२ गुणांचा कटऑफ नोंदवला. फर्ग्युसन कॉलेजच्या कला शाखेचाही कटऑफ ४८२ पर्यंत पोहोचला आहे. विज्ञान शाखेत महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे ज्युनिअर कॉलेज, एसपी कॉलेज, एमईएस गरवारे कॉलेज, नेस वाडिया महाविद्यालय आणि मॉडर्न कॉलेज यांसारख्या महाविद्यालयांमध्ये मोठी स्पर्धा दिसून आली. गेल्या वर्षीच्या तुलनेत बहुतांश नामांकित महाविद्यालयांचे कटऑफ ८ ते १४ गुणांनी वाढले आहेत.

Pune Edition
May 30, 2026 Page No. 09
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*



सकाळ

पुणे, शनिवार, ३० मे २०२६ ३

# अकरावीच्या पहिल्या फेरीत पाच लाख विद्यार्थी

## राज्यातील ९,५९१ महाविद्यालयांची पहिली यादी जाहीर; विज्ञान शाखेला सर्वाधिक पसंती

**अकरावी प्रवेश**

**पुणे, ता. २९ : राज्यात इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी पहिल्या नियमित फेरीत पाच लाख ७४ हजार ९४५ विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी निवड झाली. या प्रवेश प्रक्रियेत पुणे विभागातील तीन लाख ९६ हजार २६६ जागांसाठी एक लाख नऊ हजार ६२३ विद्यार्थ्यांची पहिल्या यादीत प्रवेशासाठी निवड झाली.**

संपूर्ण राज्यातील नऊ हजार ५९१ कनिष्ठ महाविद्यालयातील केंद्रीय प्रवेश प्रक्रियेअंतर्गत (कॅप) १७ लाख ४२ हजार ४२३ जागांसाठी झालेल्या पहिल्या नियमित फेरीसाठी एकूण आठ लाख ८७ हजार २६४ विद्यार्थ्यांनी अर्ज निश्चित (लॉक) केले होते. त्यातील पाच लाख ७४ हजार ९४५ विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी महाविद्यालय मिळाले. पुणे विभागातील पुणे, अहिल्यानगर, सोलापूर जिल्ह्यात मिळून अकरावीच्या प्रवेशासाठी तीन लाख ९६ हजार २६६ जागा आहेत. पहिल्या यादीत एक लाख नऊ हजार ६२३ विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी महाविद्यालय मिळाले. प्रवेशासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष संबंधित महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करण्यासाठी सहा जूनपर्यंतची मुदत देण्यात आली.



### विभागनिहाय पहिली 'कॅप' फेरी

| विभाग | प्रवेश क्षमता | 'कॅप'साठी अर्ज लॉक केलेले विद्यार्थी | पहिल्या फेरीत निवड झालेले विद्यार्थी |
|---|---|---|---|
| अमरावती | २,०१,२१५ | ८७,११२ | ५८,६८६ |
| छ. संभाजीनगर | ३,११,०४५ | १७,१४४ | ६४,८६८ |
| कोल्हापूर | २,०२,१८० | ९४,७७३ | ५४,७७० |
| लातूर | १,५४,०९० | ५१,३०० | ३३,६७४ |
| मुंबई | ४,७७,२१० | २,९२,९१७ | १,३३,३२३ |
| नागपूर | २,२४,९९५ | ७७,४५३ | ५४,९३७ |
| नाशिक | २,२२,८६५ | १,०२,१०७ | ६५,०६४ |
| पुणे | ३,९६,२६६ | १,७२,७११ | १,०९,६२३ |
| एकूण | २१,९८,६६६ | ८,८७,२६४ | ५,७४,९४५ |

"कनिष्ठ महाविद्यालयात अकरावीचा प्रवेश निश्चित करताना गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला सादर करू शकत नाही, अशा विद्यार्थ्यांकडून दिलेल्या वेळेत कागदपत्रे जमा करण्याबाबत हमीपत्र घेऊन प्रवेश निश्चित करावा," अशी सूचना पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे यांनी दिली.

**मंडळनिहाय प्रवेश निवड**

मंडळ : विद्यार्थ्यांची संख्या
- राज्य मंडळ ........ ५,२६,१६१
- सीबीएसई ........ ३५,१७१
- आयसीएसई ........ १०,१०१
- आयबी ........ २६
- आयजीसीएसई ........ १३१
- एनआयओएस ........ १५०
- इतर ........ १,६०३

## नियमित फेरीत कट-ऑफ नव्वदीपार

इयत्ता अकरावीच्या प्रवेशाच्या पहिल्याच नियमित फेरीत नामांकित महाविद्यालयांच्या कट-ऑफचे नव्वदी ओलांडल्याने विद्यार्थ्यांपुढे मोठे आव्हान उभे राहिले आहे. ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांचीही नामांकित महाविद्यालयातील एका जागेसाठी अक्षरशः झुंबड उडत आहे.

अशातच, ९० टक्क्यांपेक्षा कमी आणि ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची अवस्था त्रिशंकुसारखी झाली आहे. बहुसंख्येने असणाऱ्या या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आता पुढील फेऱ्यांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. गुणवत्तेत झपाट्याने झालेली वाढ, मर्यादित जागा आणि प्रतिष्ठित महाविद्यालयांकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल, यामुळे यंदाची प्रवेश प्रक्रिया अधिक चुरशीची ठरत आहे.

अकरावी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या नियमित फेरीतील निवड यादी आणि कट-ऑफ शुक्रवारी जाहीर केला. यात शहरातील नामांकित महाविद्यालयाचा विज्ञान शाखेसह कला, वाणिज्य शाखेचा कट-ऑफ यावर्षीही नव्वदीच्या पुढे असल्याचे दिसून आले. यंदा महाविद्यालयांतील कट-ऑफमध्ये चढ-उतार असल्याचे निदर्शनास येते. फर्ग्युसन महाविद्यालयाचा कला शाखेचा कट-ऑफ हा गेल्यावर्षी प्रमाणेच आहे. परंतु, विज्ञान शाखेच्या कट-ऑफमध्ये काही गुणांचा फरक आहे. तर लक्ष्मणराव आपटे प्रशालेतील विज्ञान शाखेचा कट-ऑफ गेल्यावर्षीप्रमाणेच असून, वाणिज्य शाखेच्या कट-ऑफमध्ये अवघ्या चार गुणांनी यंदा वाढला. शहरातील बीएमसीसी, सर परशुरामभाऊ महाविद्यालय, सिंबायोसिस महाविद्यालय, मॉडर्न महाविद्यालय अशा महाविद्यालयांचा गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कट-ऑफमध्ये लक्षणीय फरक नसला, तरीही काही गुणांचा चढ-उतार असल्याचे निदर्शनास येते.

### नामांकित महाविद्यालयांचा कट-ऑफ

| महाविद्यालय | वाणिज्य | विज्ञान | कला |
|---|---|---|---|
| फर्ग्युसन महाविद्यालय | – | ९५.६० | ९६.४० |
| लक्ष्मणराव आपटे प्रशाला | ८४.२० | ९५.२० | – |
| बीएमसीसी | ९६.४० | – | – |
| सिंबायोसिस महाविद्यालय | ९३.८० | – | ९२.२० |
| गरवारे वाणिज्य महाविद्यालय | ९३.२० | – | – |
| सर परशुरामभाऊ महाविद्यालय | ९१.६० | ९२.८० | ९२.२० |
| मॉडर्न महाविद्यालय | ८८.२० | ९१.२० | ९०.४ |
| आबासाहेब गरवारे महाविद्यालय | – | ९०.२० | ७२.४० (मराठी) |
| नौरोसजी वाडिया | – | ८८ | ८७.६० |
| नेस वाडिया : | ८६.६० | – | – |

सर्व आकडे टक्क्यांत

### पहिल्या फेरीतील निरीक्षणे

- ९० टक्के गुण मिळवूनही पहिल्या यादीत निवड झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी
- शहरातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालयांत कला शाखेचा कट-ऑफही नव्वदीपार
- नामांकित महाविद्यालयात विज्ञान शाखेतील प्रवेशासाठी ९० पेक्षा जास्त टक्के असणाऱ्यांना मिळाली संधी
- 'टॉप तीन' महाविद्यालयात वाणिज्य शाखेतील प्रवेशासाठी ९३ टक्क्यांपेक्षा जास्त गुणाचा कट-ऑफ

Sakal 30.5.2026

## *News Paper Clippings During May 2026*

### *Section: Education*

पुढारी

# विद्यापीठे, महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकनाला मुहूर्त कधी?

## मॅच्युरिटी बेस्ड ग्रेडिंग प्रणाली कार्यान्वित करण्याच्या नावाखाली दोन वर्षांपासून प्रक्रियाच बंद

**पुढारी विशेष**

**गणेश खळदकर**
पुढारी प्रतिनिधी

**पुणे : राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद अर्थात नॅक उच्च शिक्षण संस्थांची मूल्यांकनाची श्रेणी पद्धत बंद करून मॅच्युरिटी बेस्ड ग्रेडिंग प्रणाली सुरू करणार आहे. ही घोषणा होऊन दोन वर्षांचा कालावधी लोटला. नवीन पध्दतीने मूल्यांकन होणार असल्यामुळे जुन्या पध्दतीचे मूल्यांकन बंद केले आहे. त्यामुळे विद्यापीठे आणि महाविद्यालयांना मोकळे रान मिळाले असून, नवीन पध्दतीने नॅक मूल्यांकन करण्याला मुहूर्त कधी मिळणार? असा प्रश्न आता उपस्थित करण्यात येत आहे.**

नॅक मूल्यांकनासाठी महाविद्यालये, उच्च शिक्षण संस्थांमध्ये उच्च श्रेणी प्राप्त करण्यासाठी स्पर्धा असते. परंतु, ही श्रेणी पद्धत हद्दपार करण्यात आली आहे. आता नॅक मूल्यांकनात बायनरी पद्धतीचा वापर करण्यात येईल. त्यात मूल्यांकन झाले, मूल्यांकनाच्या प्रतीक्षेत, मूल्यांकन झालेले नाही, असे तीन स्तर असतील. ही पद्धत जगातील आघाडीच्या देशांमध्ये वापरली जाते. या पद्धतीमुळे अधिकाधिक उच्च शिक्षण संस्थांनी मूल्यांकनाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

संबंधित मूल्यांकनामध्ये एक ते पाच स्तर तयार करून उच्च शिक्षण संस्थांना त्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. स्तर चार हा राष्ट्रीय उत्कृष्टतेचा असेल, तर स्तर पाच हा जागतिक उत्कृष्टतेचा असेल. उच्च शिक्षण संस्थांना मूल्यांकनासाठी डेटा सादर करण्याची प्रक्रिया सोपी होण्यासाठी वन नेशन वन डेटा प्लॅटफॉर्म लागू करण्यात येणार आहे.

महाविद्यालयांनी नॅकच्या वेबसाइटवर त्यांचा मूल्यांकनासाठीचा डेटा उपलब्ध करून द्यायचा आहे. त्यामुळे मूल्यांकनासाठी उच्च शिक्षण संस्थांना भेटी देण्याचे प्रमाण कमी होईल, असे स्पष्ट करण्यात आले होते.

प्रत्यक्षात गेल्या दोन वर्षांपासून जुन्या तसेच नवीन, अशा कोणत्याही पध्दतीने उच्च शिक्षण संस्थांचे मूल्यांकनच होत नसल्याचे वास्तव उघडकीस आले आहे.

### नॅक मूल्यांकनात याची घेतली जाते नोंद

शैक्षणिक प्रक्रियेत संस्थेची कामगिरी, अभ्यासक्रमाची निवड आणि अंमलबजावणी, शैक्षणिक दर्जा आणि मूल्यमापन, विद्यार्थ्यांचे निकाल, संशोधनकार्य आणि विद्या शाखा सदस्यांचे प्रकाशन, मूलभूत सुविधा आणि संसाधनांची स्थिती, संस्था, प्रशासन, आर्थिक स्थिती आणि विद्यार्थी सेवा इत्यादीची नोंद नॅक मूल्यांकनात घेतली जाते.

"नॅकची मॅच्युरिटी बेस्ड ग्रेडिंग प्रणाली कार्यान्वित होईपर्यंत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा मागील 'A+' दर्जा वैध राहणार असून, पुढील मूल्यांकनाची तयारी सुरू करण्यात आली आहे.

- **डॉ. सुरेश गोसावी**, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



### काय आहे सद्य:स्थिती...

- नॅक मूल्यांकन झालेली महाविद्यालये : ८ हजार ७४९
- नॅक मूल्यांकन झालेली विद्यापीठे : ५७३
- ए प्लस प्लस श्रेणी असलेल्या संस्था : ३१३
- ए प्लस श्रेणी असलेल्या संस्था : ८३०
- ए श्रेणी असलेल्या संस्था : १ हजार ४६३
- बी प्लस प्लस श्रेणी असलेल्या संस्था : १ हजार ५७१
- बी प्लस श्रेणी असलेल्या संस्था : १ हजार ६७२
- बी श्रेणी असलेल्या संस्था : २ हजार ५११
- सी श्रेणी असलेल्या संस्था : ८९७
- डी श्रेणी असलेल्या संस्था : ६४

Pune Edition
May 04, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During May 2026*

## *Section: Education*

लोकमत

मस्ट READ

# पदवीच्या विद्यार्थ्यांना बॅकलॉग विषय पूर्ण करता येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** अंतिम आणि अंतिमपूर्व वर्षातील बॅकलॉग विषय पूर्ण करून पदवी मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना अंतिम संधी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतला आहे. यामुळे पदवीपासून केवळ काही पावले दूर असलेल्या, बॅकलॉग विषयांच्या कचाट्यात अडकलेल्या शेकडो विद्यार्थ्यांना मोठी संधी प्राप्त झाली आहे. ही परीक्षा अर्ज प्रक्रिया ११ मे २०२६ पासून सुरू होईल, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अनेक विद्यार्थ्यांचे काही विषय अद्याप सुटलेले



नाहीत. त्यामुळे त्यांची पदवी रखडली आहे. या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून परीक्षा विभागाने त्यांना पुन्हा एकदा परीक्षेला बसण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. सध्या विद्यापीठ स्तरावर या विद्यार्थ्यांच्या समकक्ष विषयांची पडताळणी, त्यांना यापूर्वी मिळालेल्या संधींचा आढावा, प्राप्त झालेल्या तक्रारी आणि प्रलंबित न्यायप्रविष्ट प्रकरणांची छाननी करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सोमवार (दि. ११) पासून अर्जाची लिंक उपलब्ध करून दिली जाणार आहे.

यासंदर्भात परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. प्रभाकर देसाई यांनी सर्व संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थांना परिपत्रकाद्वारे कळविले आहे. तसेच या निर्णयाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे सूचित केले आहे. या प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांमध्ये कोणताही संभ्रम राहू नये आणि पात्र विद्यार्थ्यांपर्यंत ही माहिती वेळेत पोहोचावी, यासाठी महाविद्यालयांनीदेखील विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहनदेखील केले आहे.

### विद्यार्थ्यांना पुन्हा अशी संधी मिळणार नाही

**शैक्षणिक वर्ष २०१५-१६, २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून २०१३/२०१९ पॅटर्ननुसार प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या, पण द्वितीय व तृतीय वर्षाचे काही विषय राहिलेल्या विद्यार्थ्यांना बॅकलॉग विषयांची परीक्षा देता यावी यासाठीचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने घेतला आहे. आपल्या महाविद्यालयातील अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरले जातील याकडे सर्व विभाग प्रमुख आणि प्राध्यापकांनी लक्ष द्यावे. या विद्यार्थ्यांना पुन्हा अशी संधी मिळणार नाही, याची सर्वांनी दक्षता घ्यावी, असेही स्पष्ट केले आहे.**

Pune Main
Page No. 4 May 05, 2026
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During May 2026*

### *Section: Education*

# पारंपरिक पदवीला मागणी वाढण्याची शक्यता

## बारावी निकालात घट झाल्याचा परिणाम; प्रवेशांची लगबग सुरू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (राज्य मंडळ) बारावीचा निकाल जाहीर केल्यानंतर आता पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशाची लगबग सुरू झाली आहे. यंदा बारावीच्या निकालात घट झाल्यामुळे पारंपरिक पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेतील पात्रता गुणांमध्ये काही प्रमाणात घट होण्याची शक्यता असून, पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

उच्च शिक्षणाकडे जाण्यासाठी बारावीचा टप्पा महत्त्वाचा असतो. बारावी उत्तीर्ण झाल्यावर अभियांत्रिकी, वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांसह विद्यार्थ्यांचा कल वैद्यकीय, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र अशा विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकडे असतो. त्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेशांच्या परीक्षा आणि पुढील प्रवेश प्रक्रिया राज्य समाइक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे (सीईटी सेल) राबवण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्या परीक्षा द्याव्या लागतात. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह खासगी अभिमत विद्यापीठ, खासगी विद्यापीठे प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेतात. स्वायत्त महाविद्यालयेही काही विशिष्ट अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा घेतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना या प्रवेश परीक्षांची माहिती घेऊन अर्ज भरून परीक्षा देणे बंधनकारक आहे. या प्रवेश परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतरच प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. महाविद्यालयांतील कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील पारपंरिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया मात्र सुरू करण्यात आली आहे.

### प्रवेशासाठी महत्त्वाचे...

- संबंधित महाविद्यालयांच्या संकेतस्थळाद्वारे प्रवेशअर्ज भरणे.
- महाविद्यालयांकडून निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी जाहीर केली जाते.
- निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात जाऊन प्रवेश घ्यायचा.
- पदवी अभ्यासक्रमांचे नावीन्यपूर्ण पर्याय : लिबरल आर्ट्स, ब्लेंडेड बीएस्सी, विदा विज्ञान, ॲनिमेशन, फॅशन टेक्नॉलॉजी, सिव्हिल सर्व्हिसेस
- एकाच वेळी दोन पदव्या : 'यूजीसी'च्या नव्या नियमानुसार विद्यार्थ्यांना पूर्ण वेळाचा पदवी अभ्यासक्रम करताना आणखी एक पदवी अभ्यासक्रमही करण्याची मुभा आहे. त्यात विद्यार्थी ऑनलाइन किंवा दूरस्थ अभ्यासक्रमांची निवड करू शकतात.
- पदवीस्तरावरच कौशल्यविकासाचा विचार करून रोजगारक्षमता वाढवण्याच्या दृष्टीने विद्यार्थी पावले टाकू शकतात.

गेल्या वर्षीपेक्षा यंदा बारावीचा निकाल कमी झाला असला, तरी पदवी प्रवेशांच्या पात्रता गुणांवर फारसा परिणाम होणार नाही. गेल्या वर्षी सरासरी ९०-९१ टक्के पात्रता गुण आवश्यक होते.

**- डॉ. अविनाश मोहरील**
प्राचार्य, स. प. महाविद्यालय

यंदा गुणवंतांची संख्या काही प्रमाणात कमी झाल्याने काही विद्यार्थी विज्ञान पदवी, कला पदवीकडे वळू शकतात. परिणामी, पारंपरिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशांमध्ये वाढ होऊ शकते.

**- डॉ. संजय खरात**
प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड

Loksatta 6.5.2026

## *News Paper Clippings During May 2026*

### *Section: Education*

# पुढारी

पुढारी ANCHOR

# शिक्षकांना आता दरवर्षी प्रशिक्षण

## राज्यातील शिक्षकांना ५० तासांचे प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**आधुनिक अध्यापन पद्धती, नवकल्पना आणि शिक्षकांच्या ज्ञान, कौशल्यात भर घालण्यासाठी राज्यातील शिक्षकांना दरवर्षी किमान घड्याळी ५० तासांचे प्रशिक्षण अनिवार्य करण्यात आले आहे. ऑनलाइन आणि ऑफलाइन असे स्वरूप असलेल्या प्रशिक्षणामध्ये शिक्षक, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक आणि पर्यवेक्षक यांचा समावेश असून, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतर्फे प्रशिक्षणाचे नियोजन केले जाणार आहे.**

शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासननिर्णय प्रसिद्ध केला. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार २१व्या शतकातील कौशल्ये आत्मसात करताना शिक्षकांनी नवतंत्रज्ञान, डिजिटल साधने आणि विद्यार्थीकेंद्रित अध्यापन पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. त्यामुळे किमान घड्याळी ५० तासांचे प्रशिक्षण शिक्षकांना अनिवार्य केले आहे. प्रशिक्षणाचे राज्यस्तरीय नियोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे केले जाणार आहे, तर जिल्हास्तरावर जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेमार्फत अंमलबजावणी करण्यात येणार आहे. इतर कोणत्याही संस्था, स्वयंसेवी संघटना किंवा सीएसआरच्या माध्यमातून स्वतंत्र प्रशिक्षण आयोजित करता येणार नाही.

अन्य संस्थांच्या प्रशिक्षण साहित्याची पडताळणी करून आवश्यकतेनुसार प्रशिक्षणाच्या मुख्य आराखड्यात त्याचा समावेश करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरवर्षी एप्रिलमध्येच वर्षभराचा प्रशिक्षण आराखडा जाहीर होणार आहे. त्यात ऑनलाइन, प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि शिक्षण परिषदांचा समावेश असेल. या आराखड्यामुळे शिक्षकांना शालेय अध्यापन, रजांचे नियोजन करता येईल. घड्याळी तासांनुसार प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर शिक्षकांना प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### ...असे राहणार स्वरूप

एकूण ५० तासांच्या प्रशिक्षणात ३० तास प्रत्यक्ष (ऑफलाइन) आणि २० तास ऑनलाइन प्रशिक्षणाचा समावेश असेल. ऑफलाइन प्रशिक्षण राज्य ते केंद्र स्तरापर्यंत राबवले जाणार असून, प्रत्येक बॅचमध्ये ४० ते ५० शिक्षकांचा सहभाग असेल, तर ऑनलाइन प्रशिक्षण दीक्षा, स्वयम, निष्ठा, एनसीईआरटी, सीबीएसई, शासन मान्यताप्राप्त संस्था अशा अधिकृत व्यासपीठामार्फत पूर्ण करणे बंधनकारक असेल. दर महिन्यात किमान दोन तास ऑनलाइन प्रशिक्षण पूर्ण करणे अपेक्षित आहे.

### प्रशिक्षणावर देखरेख, कारवाईचा इशारा

प्रशिक्षणाची उपस्थिती, प्रगती आणि मूल्यमापन 'विद्या समीक्षा केंद्र' संकेतस्थळाद्वारे नोंदवले जाणार आहे. प्रशिक्षणासाठी शिक्षकांना ठराविक कायमर्यादित कार्यमुक्त करणे बंधनकारक आहे. असे न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल. प्रशिक्षणास अनुपस्थित राहणाऱ्या किंवा प्रशिक्षण अपूर्ण ठेवणाऱ्या करणाऱ्या शिक्षकांवर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

Pune Edition
May 07, 2026 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During May 2026*

### *Section: Education*

# पुढारी

# दहावी-बारावीच्या परीक्षा शुल्कात वाढ

## जून- जुलैमधील पुरवणी परीक्षेपासून सुधारित शुल्क लागू



**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (राज्य मंडळ) जून-जुलैमध्ये होणाऱ्या दहावी-बारावीच्या पुरवणी परीक्षेच्या शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु या शुल्कवाढीवर आक्षेप घेण्यात आला आहे. राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी परीक्षा शुल्कवाढीबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

दहावीचे नियमित विद्यार्थी, तंत्रविषय विद्यार्थी, खासगी विद्यार्थी यांच्यासाठी निश्चित केलेल्या शुल्कात परीक्षा शुल्क ५७० रुपये, प्रशासकीय शुल्क २० रुपये, गुणपत्रिका शुल्क २० रुपये, प्रमाणपत्र शुल्क २० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (शास्त्र विषय) १० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (तंत्र प्रती विषय) १०० रुपये, खासगी विद्यार्थी नोंदणी शुल्क १११० रुपये, खासगी विद्यार्थी प्रक्रिया शुल्क १०० रुपये, पुनर्परीक्षार्थी आणि तुळक विषय विद्यार्थ्यांसाठी शुल्कात परीक्षा शुल्क ५७० रुपये, प्रशासकीय शुल्क २० रुपये, गुणपत्रिका शुल्क २० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (शास्त्र विषय) १० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (तंत्र प्रती विषय) १०० रुपये, तर श्रेणीसुधार परीक्षेसाठी नियमित किंवा खासगी विद्यार्थी ११३० रुपये, प्रशासकीय शुल्क २० रुपये, गुणपत्रिका शुल्क २० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (शास्त्र विषय) १० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क १०० रुपये निश्चित केले आहे.

बारावीचे नियमित, खासगी विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क ५९० रुपये, प्रशासकीय शुल्क २० रुपये, गुणपत्रिका शुल्क २० रुपये, प्रमाणपत्र शुल्क २० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा (प्रतीविषय) १५ रुपये, एमसीव्हीसी प्रात्यक्षिक परीक्षा (प्रतीविषय) ३० रुपये, माहिती तंत्रज्ञान विषय शुल्क २०० रुपये, खासगी विद्यार्थी नोंदणी शुल्क १११० रुपये, खासगी विद्यार्थी प्रक्रिया शुल्क १०० रुपये, पुनर्परीक्षार्थी आणि तुरळक विषयांसाठी परीक्षा शुल्क ५९० रुपये, प्रशासकीय शुल्क २० रुपये, गुणपत्रिका शुल्क २० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा (प्रतीविषय) १५ रुपये, एमसीव्हीसी प्रात्यक्षिक परीक्षा (प्रतीविषय) ३० रुपये, माहिती तंत्रज्ञान विषय शुल्क (प्रतीविषय) २०० रुपये, श्रेणीसुधार परीक्षेसाठी नियमित विद्यार्थी, पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी परीक्षा शुल्क ११८० रुपये, प्रशासकीय शुल्क २० रुपये, गुणपत्रिका शुल्क २० रुपये, एमसीव्हीसी प्रात्यक्षिक परीक्षा (प्रतीविषय) ३० रुपये, माहिती तंत्रज्ञान विषय शुल्क (प्रतीविषय) २९९ रुपये असे शुल्क निश्चित केल्याचे नमूद करण्यात आले आहे.

### पुन्हा शुल्कवाढ बोजा कशासाठी?

राज्य मंडळाने २०२२ मध्ये शुल्कवाढीचा निर्णय घेतला होता. त्यास शासनाने मंजुरी दिली होती. त्यानुसार तीन वर्षांत एकूण ३० टक्के शुल्क वाढवण्यात आले आहे. मग आता पुन्हा शुल्कवाढ कशासाठी, तसेच राज्य मंडळाने आता प्रमाणपत्र आणि गुणपत्रक एकत्रित करण्याचा निर्णय घेतला आहे. तरीही त्यासाठी स्वतंत्र शुल्क आकारणी करण्याचे कारण काय, असे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

Pune Edition
May 07, 2026 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During May 2026*

### *Section: Education*

# पुढारी

# अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर!

## ८ ते २० मे दरम्यान शून्य फेरी, तर २१ ते २८ मेदरम्यान पहिल्या फेरीतील प्रवेश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**दहावीचा निकाल लागल्यानंतर लगेचच माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. महेश पालकर यांनी अकरावी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात केली असून, अकरावी प्रवेशाच्या शून्य तसेच पहिल्या फेरीचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार ८ मे ते २० मेदरम्यान शून्य फेरी, तर २१ मे २८ मेदरम्यान पहिल्या फेरीतील प्रवेश होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.**

अकरावीसाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवली जात असून, आतापर्यंत ७ लाख ७४ हजार ९१८ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा पहिला भाग भरला आहे. अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू असून, विद्यार्थी येत्या ११ मेपासून प्रवेश अर्जातील पहिला व दुसरा भाग भरू शकतात. इयत्ता दहावी उत्तीर्ण झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला केवळ ऑनलाइन पद्धतीनेच प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रवेश अर्ज भरावा, असे आवाहन डॉ. पालकर यांनी केले आहे.

शिक्षण विभागातर्फे अकरावी प्रवेशाची शून्य फेरी ८ मेपासून सुरू झाली असून, विद्यार्थी प्रवेश अर्जाचा पहिला भाग भरू शकतात. ११ मे ते १३ मे या कालावधीत विद्यार्थी अर्जाचा पहिला भाग व दुसरा भाग तसेच व्यवस्थापन, अल्पसंख्याक, इन-हाऊस खोट्या संदर्भातील माहिती भरू शकतात. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी किमान एक आणि कमाल १० कनिष्ठ महाविद्यालयांची प्राधान्याने नोंदणी करावी. तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी १४ ते १५ मेदरम्यान प्रसिद्ध केली जाईल. या यादीवर १६ मे रोजी विद्यार्थ्यांना हरकती नोंदवता येतील. २० मे रोजी पहिल्या फेरीसाठी रिक्त जागा प्रदर्शित केल्या जाणार आहेत.

### पॉलिटेक्निकची प्रवेशप्रक्रिया लवकरच




दहावीनंतरच्या प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनीअरिंग (पॉलिटेक्निक) प्रवेशासाठी साधारण १ लाखांहून अधिक जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी प्रवेशाचे वेळापत्रक लवकरच जाहीर होणार असून, विद्यार्थ्यांना ऑनलाइन नोंदणी करताना कागदपत्रांच्या छायांकित प्रतीही स्कॅन करून अपलोड कराव्या लागणार आहेत. विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या सविस्तर माहितीसाठी https:///dte.maharashtra.gov.in या वेबसाइटवर भेट द्यावी.

### पहिली फेरी

शून्य फेरी संपल्यानंतर २१ ते २८ मेदरम्यान नियमित पहिली फेरी राबविण्यात येणार आहे. त्यानुसार २१ मे सकाळी ८ ते २२ मे सायंकाळी ६ वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना भाग एक भरणे, अर्जाचा भाग दोन भरणे ही प्रक्रिया करता येणार आहे. २३ ते २६ मेदरम्यान विद्यार्थ्यांना महाविद्यालयांचे प्रवेश जाहीर करण्याची प्रक्रिया करण्यात येणार आहे. २६ ते २८ मेदरम्यान विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये जाऊन प्रत्यक्ष प्रवेश घेता येणार आहे. २९ मे रोजी दुसऱ्या फेरीसाठी रिक्त जागा जाहीर करण्यात येतील. तसेच ३० मे रोजी दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### आयटीआयसाठी प्रवेशप्रक्रिया लवकरच

व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयातर्फे (डीव्हीईटी) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील (आयटीआय) विविध अभ्यासक्रमांची ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया येत्या काही दिवसांत सुरु होण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी सरकारी आणि खासगी आयटीआयमध्ये मिळून दीड ते दोन लाखांहून अधिक जागा उपलब्ध होत्या. आयटीआय प्रवेशाकडे दिवसेंदिवस विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. ज्या विद्यार्थ्यांना ४५ ते ६० टक्के गुण आहेत अशा विद्यार्थ्यांनी आयटीआय प्रवेशाला प्राधान्य देण्याचे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी https://admission.dvet.gov.in ला भेट द्यावी.

## यंदा १ जुलैपासून वर्ग सुरू

**पुणे :** अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला गती मिळाली असून, यंदा २०२६-२७ चे शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू करण्यासाठी शिक्षण विभागाने तयारी पूर्ण केली आहे. विद्यार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी वेगाने सुरु असून, अकरावीचे वर्ग १ जुलैपासून सुरू करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी दिली आहे.

**अकरावी प्रवेशप्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचे शिक्षण आयुक्तांचे अश्वासन**

राज्यातील अकरावीची ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया दर वर्षी रेंगाळत असून, या प्रक्रियेत १० फेऱ्यांपेक्षा अधिक फेऱ्या होतात. त्याचप्रमाणे दिवाळीनंतरही प्रवेशप्रक्रिया सुरू राहत असल्याने, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. याबाबत प्रश्न उपस्थित केल्यानंतर सिंह यांनी सांगितले, की दर वर्षी सुमारे ९० टक्के विद्यार्थ्यांचे प्रवेश लवकर पूर्ण होतात. मात्र, काही विद्यार्थ्यांना पहिल्या फेऱ्यांमध्ये प्रवेश मिळत नसल्याने संपूर्ण प्रक्रिया रेंगाळते. ग्रामीण भागात काही ठिकाणी तांत्रिक अडचणी निर्माण होतात. अशा वेळी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून त्यांच्यासाठी अतिरिक्त प्रवेश फेऱ्या राबवाव्या लागतात आणि त्यामुळे प्रवेश प्रक्रियेला उशीर होतो. यंदा निकाल लवकर जाहीर झाला असून, ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया लवकर सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे अकरावीचे शैक्षणिक वर्ग वेळेत सुरू ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. उर्वरित विद्यार्थ्यांचे प्रवेशही पुढील फेऱ्यांद्वारे तातडीने पूर्ण केले जातील, असेही सिंह यांनी स्पष्ट केले.

### आतापर्यंत पावणेआठ लाख विद्यार्थ्यांची नोंदणी

प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी, प्राधान्यक्रम निवड व कागदपत्रे अपलोड ही सर्व प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, अकरावी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी https:///mahafyjcadmissions.in/landing या वेबसाइटहून नोंदणी करायची आहे. या वेबसाइटवर आता ९ हजार ५९४ ज्युनिअर कॉलेजांची नोंदणी झाली आहे. त्याचप्रमाणे ७ लाख ७७ हजार २३३ विद्यार्थ्यांनी नोंदणी करित भाग १ भरला आहे. आता भाग २ म्हणजेच प्रवेशासाठी कॉलेजांचे प्राधान्यक्रम भरण्याची प्रक्रिया लवकर सुरू होईल. विद्यार्थ्यांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

Pune Edition
May 09, 2026 Page No. 07
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During May 2026*

### *Section: Education*

प्रभात

# शैक्षणिक संस्थांमध्ये इंधन बचत जनजागृती

**पुणे, दि. १७ -** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे आणि जीवनशैलीत बदलाबाबत चर्चासत्रे, वेबिनारद्वारे शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि उच्च शैक्षणिक संस्थांनी या आवाहनाची गांभीर्याने दखल घ्यावी. शैक्षणिक संकुलांमध्ये या विषयावर चर्चासत्रे, वेबिनार आणि जनजागृती मोहिमा राबवून विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या मोहिमेत सहभागी करून घ्यावे. त्याचा अहवालही सादर करावा, असे निर्देश उच्च शिक्षण शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी सर्व विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक, सर्व विद्यापीठांचे कुलसचिव यांना दिले आहेत.

Pune City Edition
May 18, 2026 Page No. 16
Powered by: erelego.com

# राज्यातील कॉलेजांत 'बायोमेट्रिक' करणार अनिवार्य

## क्लासचे लागेबांधे तोडण्यासाठी विभागाचा आराखडा

हर्ष दुधे
Harsh.Dudhe@timesofindia.com

**पुणे :** राज्यातील महानगरांमधील कनिष्ठ महाविद्यालये आणि कोचिंग क्लासचे 'लागेबांधे' (इंटिग्रेटेड स्ट्रक्टर) तोडण्यासाठी; तसेच कॉलेजांमधील उपस्थिती वाढविण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने पावले उचलली आहेत. सर्व कॉलेजांमध्ये बायोमेट्रिक सिस्टीम अनिवार्य करण्यासाठी बृहद आराखडा आखला आहे. यानुसार विद्यार्थ्यांची अधिकाधिक उपस्थिती वर्गांमध्ये अनिवार्य करण्यात येणार असून, त्याची रोजची माहिती थेट एका क्लिकवर संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांसह माध्यमिक शिक्षण संचालक कार्यालय; तसेच राज्य मंडळाला दिसणार आहे.

## लागेबांध्यांचे जाळे तुटणार का?

कॉलेजांमध्ये कागदोपत्री हजेरी, क्लासमध्ये शिक्षण, शिक्षण विभागाच्या कारवाईकडे लक्ष




मुंबई महानगर क्षेत्र, पुणे-पिंपरी चिंचवड, नागपूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, जळगाव , लातूर, नांदेड, सोलापूर अशा महानगरांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची उपस्थिती कमालीची खालावली आहे. महाविद्यालयांत विद्यार्थी केवळ कागदोपत्री उपस्थित राहत असून, बारावीचा; तसेच 'नीट', 'जेईई' आणि 'सीईटी'चा अभ्यास करण्यासाठी कोचिंग क्लासला प्राधान्य दिले जात आहे. हा प्रकार आता तालुक्यांपर्यंत पसरल्याने ग्रामीण भागातही 'इंटिग्रेटेड'चे पेव फुटले आहे.

या क्लासचा मुख्य उद्देश स्पर्धा परीक्षांचे शिक्षण देणे असल्याने, परीक्षेत उत्तम गुण मिळवण्यासाठी क्लासच्या विद्यार्थ्यांमध्ये जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली आहे. नामांकित महाविद्यालयांत वैद्यकीय; तसेच अभियांत्रिकीच्या मोजक्या जागा असल्याने, चांगले गुण मिळण्यासाठी विद्यार्थ्यांसोबतच पालकही गैरमार्गावर जात आहेत. त्यातून 'नीट' पेपरफुटीसारखे प्रकार घडत आहे. हे प्रकार रोखायचे असल्यास, त्याची सुरुवात कॉलेज-क्लासचे 'लागेबांधे' तातडीने तोडण्याची गरज आहे. यासाठी शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांची कॉलेजांमधील ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. याबाबत 'महाराष्ट्र टाइम्स'ने वेळोवेळी सविस्तर वार्तांकन करून, हा प्रकार प्रकाशझोतात आणला आहे.

अखेर शालेय शिक्षण विभागाला जाग आली असून, शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पावल उचलण्यास सुरूवात केली आहे. त्यानुसार कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५ टक्क्यांपेक्षा कमी असल्यास, त्यांना बारावीच्या परीक्षेला बसता येणार नाही, या निर्णयाची सक्तीने अंमलबाजवणी करण्यावर चर्चा सुरू आहे. त्यासाठी राज्यातील ९,५९१ कॉलेजांमध्ये बायोमेट्रिक सिस्टीम लावण्याबाबत चर्चा झाली असून, त्यासाठी १०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. ही प्रणाली बसवण्यासाठी कॉलेजला कोणताही मोठा खर्च येणार नाही. या खर्चाला शालेय शिक्षण विभागाकडून मान्यता मिळाल्यास, तातडीने प्रक्रिया सुरू होणार आहे, अशी माहिती शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

Maharashtra Times 27.5.2026

## *News Paper Clippings During May 2026*

### *Section: Education*

# नवराष्ट्र

Pune | 30 May 2026 | Page 1

# शिक्षण धोरणासाठी 'टास्क फोर्स'


## अध्यक्षपदी डॉ. नितीन करमळकर; विद्यापीठांतील अडचणींवर उपाय


▶ **पुणे, शहर प्रतिनिधी.** राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० (एनईपी-२०२०) प्रभावी आणि एकसमान पद्धतीने राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने स्वतंत्र 'कार्यबल गट ('टास्क फोर्स')' स्थापन करण्याचा शासन निर्णय जारी केला आहे. या कार्यबल गटाच्या अध्यक्षपदी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शुक्रवारी (दि. २९) यासंदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध केला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीदरम्यान राज्यातील विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये विविध शैक्षणिक, प्रशासकीय आणि तांत्रिक अडचणी समोर येत असल्याने या अडचणींचे निराकरण करण्यासाठी तसेच शासनाला आवश्यक शिफारशी करण्यासाठी हा कार्यबल गट गठीत करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांसाठी 'मदत कक्ष'

विद्यार्थ्यांच्या विद्यापीठांतर्गत स्थलांतरासाठी नियमावली तयार करणे, लॅटरल एंट्री व री-एंट्री संदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे ठरविणे, राज्यभर एकसमान शैक्षणिक दिनदर्शिका लागू करण्यासाठी पाठपुरावा करणे, आयकेएस अभ्यासक्रमांसाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे तसेच विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या अडचणी सोडविण्यासाठी 'मदत कक्ष' उभारण्याची जबाबदारीही या समितीकडे देण्यात आली आहे.



### विद्यापीठांमध्ये एनईपी अंमलबजावणीसाठी धोरण

धोरणानुसार राज्यातील विद्यापीठांमध्ये चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम, शैक्षणिक क्रेडिट बँक (एबीसी), राष्ट्रीय क्रेडिट आराखडा (एनसीआरएफ), मुख्य-गौण पद्धत, ओजेटी/प्रशिक्षण, भारतीय ज्ञान प्रणाली (आयकेएस)आदी संकल्पनांची अंमलबजावणी सुरू आहे. मात्र, श्रेय हस्तांतरण, बहु-प्रवेश-निर्गमन, थेट प्रवेश, स्थलांतर, एटीकेटी नियम, शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक दिनदर्शिका आणि इंटर्नशिप यासंदर्भात एकसमान धोरणाची आवश्यकता निर्माण झाली आहे.

### अभ्यासक्रम अंमलबजावणीवर कार्य बलाची असणार नजर

यासाठी कार्यबल गट राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये नवीन अभ्यासक्रम आराखड्याची अंमलबजावणी नियोजित वेळेत होत आहे का, याचा नियमित आढावा घेणार आहे. तसेच चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमातील चौथ्या वर्षासाठी पात्रता, प्रवेश प्रक्रिया, प्रवेश शुल्क, कामावरील प्रशिक्षण ओजीटी / संशोधन प्रकल्प / इंटर्नशिप संदर्भातील निकष आणि श्रेयांक आराखडा निश्चित करण्याचे कामही समितीकडे सोपविण्यात आले आहे.

### ९ सदस्य राज्यस्तरीय 'टास्क फोर्स' समिती

या समितीत मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावचे कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे कुलगुरू, उच्च शिक्षण संचालक, तंत्रशिक्षण संचालक, निवृत्त प्राचार्य डॉ. अनिल राव आणि शिक्षणतज्ज्ञ भरत अमळकर यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. तर मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० हे भारत सरकारद्वारे लागू करण्यात आलेले नवीन शिक्षण धोरण आहे. तब्बल ३४ वर्षांनंतर (पूर्वीचे धोरण १९८६ चे होते) शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र आणि काळाला सुसंगत बदल घडवून आणण्यासाठी हे धोरण आणले गेले आहे. या धोरणाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञानाव्यतिरिक्त व्यावहारिक, कौशल्यपूर्ण आणि जागतिक दर्जाचे शिक्षण देणे हा आहे.

epaper.navarashtra.com

## *News Paper Clippings During May 2026*

### *Section: Education*

**पुढारी**

# पहिल्या फेरीत अकरावीच्या दीड लाखावर विद्यार्थ्यांचे प्रवेश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

अकरावी प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया राबवली जात असून, शुक्रवारी पहिल्या नियमित फेरीमधील प्रवेशाला सुरुवात झाली. प्रवेशाच्या दोनच दिवसांत तब्बल दीड लाख विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले. पहिल्या फेरीसाठी ५ लाख ७४ हजार ९४३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर केला आहे. या विद्यार्थ्यांना ३ जूनपर्यंत आपले प्रवेश निश्चित करता येतील.

अकरावी प्रवेशाच्या पहिल्या फेरीत शिक्षण विभागातर्फे ३ लाख २३ हजार ४१३ विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेसाठी, १ लाख २६ हजार ९० विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेसाठी, तर एक लाख २५ हजार ४१२ विद्यार्थ्यांना कला शाखेसाठी कॉलेज अलॉट करण्यात आले. या विद्यार्थ्यांमध्ये राज्य मंडळाचे सर्वाधिक ५ लाख २६१६१ विद्यार्थी आहेत. मुंबई विभागातील सर्वाधिक १ लाख ३३ हजार, तर पुणे विभागातील एक लाख ९६२२ विद्यार्थ्यांना कॉलेज अलॉट केले. पहिल्या फेरीतील प्रवेशाला शुक्रवारी सुरुवात झाल्यानंतर दोन दिवसांमध्ये १ लाख ३९ हजार ७१५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले, तर कोटाअंतर्गत पुण्यात सर्वाधिक ३२ हजार ७४४ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले.

Pune Edition
May 31, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com

**प्रभात** प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

# अकरावीसाठी मार्कलिस्ट, एलसीची सक्ती नको

**प्रभात वृत्तसेवा**

**शिक्षण संचालकांचे महाविद्यालयांना आदेश**

**पुणे, दि. ३०** - इयत्ता अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची पहिली गुणवत्ता यादी जाहीर झाली असली, तरी महाविद्यालयांना प्रवेश निश्चित करताना विद्यार्थ्यांकडे दहावीची मूळ गुणपत्रिका आणि शाळा सोडल्याच्या दाखल्यासाठी (एलसी) सक्ती करता येणार नाही, असे स्पष्ट आदेश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिले आहेत.

दहावीचा निकाल ८ मे रोजी जाहीर झाला असला, तरी विद्यार्थ्यांना अद्याप मूळ गुणपत्रिका मिळालेल्या नाहीत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. पहिल्या फेरीत महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांनी कागदपत्रांभावी प्रवेशापासून वंचित राहू नये, यासाठी महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून हमीपत्र लिहून घ्यावे, अशा सूचना शिक्षण विभागाने दिल्या आहेत.

Pune City Edition
May 31, 2026 Page No. 15
Powered by: erelego.com

# *Upcoming Events*

## June 2026

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 ***Shivswarajya Din***  | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 ***Maharana Pratap Jayanti***  | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 ***Rajarshi Shahu Maharaj Jayanti***  | 27 | 28 |
| 29 | 30 | | | | | |

# Education is the movement from darkness to light

**ALLAN BLOOM**

*Other than the Photos of Modern College Pune-5 and Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.com*